# विविध उपक्रम

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ समाजात आज एक कुतूहलाची, जाणून घेण्याची, विशिष्ट विचार मांडणारी संघटना म्हणून मान्यतेची चळवळ झालेली आहे. प्रारंभीच्या काळी असलेला थेट विरोध त्या स्वरुपात आज राहीलेला नाही, काही ठिकाणी होणारे विरोध हे धर्मांध संघटनांनी ठरवून केलेले विरोध आहेत पण एकंदरीत समाजमनाने आज अंनिस चळवळीला व्यापक रुपात मान्यता दिलेली दिसून येते. हीच मान्यता माध्यमांनीही दिली. प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक दोन्ही माध्यमांनी अंनिसच्या चळवळीला मुबलक जागा दिलेली आहे.

हे सर्व घडून आले त्याचे एक प्रमुख कारण म्हणजे ही चळवळ सतत उपक्रमशील राहिली हे आहे. सतत कोणत्याना कोणत्या कार्यक्रमांच्या निमित्ताने चळवळ लोकांच्यात राहीली म्हणून वाढली. एक विश्वावार्ह्यता निर्माण झाले. हे यश कार्यकर्त्यांचे आहे. डॉ. दाभोलकरांनी राज्यपातळीवर वैशिष्ट्यपूर्ण आंदोलने, कार्यक्रमांचे सातत्य ठेवले तशाच प्रकारे शाखांनी आपल्या स्थानिक ठिकाणी देखील ही कृतिशिलता टिकवली.

किती विविधता आहे या उपक्रमात. आणि हे उपक्रम फार खर्चीकही नाहीत. कार्यकर्त्यांचे जर शाळा, महाविद्यालये, पदाधिकारी, अधिकारी यांच्याशी चांगले संपर्क राहीले तर नियोजन करणेही सोपे, असे हे उपक्रम आहेत. या उपक्रमांत नविन असे काही नाही आपल्या शाखा जे जे काही करतात त्याची एकत्रित सुत्ररुपाने केलेली मांडणी आहे. प्रत्येक उपक्रम हा उपक्रमाचे नांव, कालावधी, भूमिका, कार्यवाही व पूर्वतयारी या क्रमाने मांडला आहे. शक्य तेथे त्या उपक्रमाच्या अंमलबजावणीस अनुभव असणाऱ्या कार्यकर्त्याचे नांव, संपर्क दिलेला आहे. म्हणजे कोणाला अधिक तपशिलात माहिती हवी असल्यास ती ते मिळवू शकतील. प्रत्येक उपक्रमासाठी काही

बाबींची नियोजनात आवश्यकता असते. त्याची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून या प्रस्तावनेतच ते मुद्दे देत आहोत. हे सर्व उपक्रमांच्या नियोजनात आवश्यक असे आहेत. ते पुढीलप्रमाणे–

१) प्रत्येक उपक्रमाची उपक्रमपूर्व बातमी द्यावी.

२) उपक्रमाचे प्रमुख पाहुणे, वार्ताहर, फोटोग्राफर, बॅनर, निमंत्रणे, नोंदवही याचीही तयारी असावी.

३) उपक्रम झाल्याचीही नंतर बातमी प्रसिद्ध करावी.

४) आपल्याकडे कायमस्वरुपी एक संपर्क डायरी असावी त्यात सर्व शाळा महाविद्यालये, त्यांचे मुख्याध्यापक, प्राचार्य यांचे संपर्क - १) अधिकारी, २) पदाधिकारी, ३) समविचारी संस्था संघटना, ४) पत्रकार यांचे संपर्क नंबर असल्यास नियोजनाची फार मदत होईल.

या बाबी सर्व उपक्रमांच्या पूर्व नियोजनात गृहीत धराव्यात.

प्रत्येक उपक्रमाबाबत आपली वैचारिक भूमिका काय? याचीही मांडणी केलेली आहे. खरे तर ते त्या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातील मुद्दे आहेत. ते मांडणीच्या वेळी उपयोगात येतील. शक्य त्या ठिकाणी कार्यक्रमाची रुपरेषा दिलेली आहे. ती आपल्या सोईप्रमाणे आपण बदलू शकता. काही उपक्रमांची नमुना प्रसिद्धी पत्रकेही आपल्याकडे उपलब्ध आहेत ती दिलेली नाहीत, आवश्यक असल्यास आपण मध्यवर्तीशी संपर्क करावा. आपणास ते पाठविण्यात येतील.

आता नव्या -जुन्या सर्वच शाखांना हे पुस्तक उपयुक्त ठरणार आहे. शाखा स्थापन झाली आता काय उपक्रम घ्यावेत? असा प्रश्न कोणाला आता पडू नये. ही पुस्तिका एक मार्गदर्शन म्हणून आहे पण अंतिम नाही, यात अनेक नवनविन उपक्रमांची भर घालता येईल. आपणास माहित असलेले असे नाविन्यपूर्ण उपक्रम जरुर लिहून पाठवा. पुढच्या आवृत्तीत त्याचा समावेश करता येईल. या पुस्तिकेबाबतच्या आपली सूचना, मते जरुर कळवावीत.

# (१) नाव- आंतरजातीय/आंतरधर्मीय/सत्यशोधकी/ नोंदणी/साध्या पद्धतीने विवाह केलेल्या जोडप्यांचा सत्कार.

**कालावधी-** १ जानेवारी अथवा आपल्या सोईप्रमाणे

## भूमिका :-

जात ही सर्वात मोठी अंधश्रद्धा आहे, जात धर्मनिरपेक्ष संघटन म्हणून आपण आपल्या संघटनेच्या परिचय देतो. जात, धर्म आणि अनुषंगिक कर्मकांडे यांना फाटा देत ज्यांनी विवाह केले त्यांचा सत्कार करणे, त्यांच्यामागे आपली शक्ती उभी करणे, त्यांना साथ देणे व प्रोत्साहन देणे या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करणे अपेक्षित आहे.

## पूर्वतयारी :-

१) वृत्तपत्रात बातमी प्रसिद्ध करणे, त्यात जोडप्यांना नाव नोंदणीचे आवाहन करणे.

२) स्वत: कार्यकर्त्यांनी जोडप्यांची भेट घेवून नोंदणी करणे, निमंत्रणे देणे व कार्यक्रमास येण्याबाबत राजी करणे.

## * कार्यवाही :-

या कार्यक्रमाचे आयोजन छोटे अथवा मोठे आपापल्या शक्यतेप्रमाणे-क्षमतेप्रमाणे करता येते. कार्यक्रमास कोणी मान्यवर वक्ते लाभल्यास जातीअंताची लढाई, धर्मनिरपेक्षता, कर्मकांडाची निरर्थकता, अनिष्ट रुढी, प्रथा, परंपरा अशा विषयांची मांडणी करता येईल. नाहीतर कार्यकर्त्यांची स्वत:च तयारी करुन याबाबत आपली भूमिका मांडावी. कार्यक्रमाची रुपरेषा खालीलप्रमाणे ठेवता येऊ शकेल- १) गित, २) प्रास्तविक व मान्यवरांचा परिचय , ३) अध्यक्ष निवड, अतिथींचा सत्कार, ४) भूमिका, ५) मान्यवरांच्या हस्ते उपस्थित जोडप्यांचा सत्कार, ६) जोडप्यांची मनोगते, ७) मान्यवरांची मनोगते, शेवटी अध्यक्षांचे आभार, ८) गाणे.

*** आवश्यक साधने :-**

जोडप्यांना सत्कारासाठी काही विशेष पुस्तके देता येतील. रुटीन सत्कार (शाल, पुष्पगुच्छ) करण्यापेक्षा आपल्या कल्पकतेने वेगळ्या रुपात करावा. या कार्यक्रमास कार्यकर्त्यांनी आपल्या कुटुंबियांसह उपस्थित रहावे.

* मार्गदर्शक संपर्क -

## (२) ३ जानेवारी- सावित्रीबाई फुले जयंती :-

**कालावधी -** ३ जानेवारी

**भूमिका :-** सावित्रीबाई फुलेंनी अतिशय विपरीत परिस्थितीत स्वत: शिक्षण घेतले व दिलेही. अनिष्ट रुढी, प्रथा परंपरांना कृतिशिल विरोध केला. ज्योतीबांच्या निधनानंतरही आपले कार्य सतत सुरु ठेवले. त्यांच्या जीवनाचा हा संदर्भ घेत आपल्या व्यक्तिगत वा सार्वजनिक जीवनात ज्या महिलांनी विशेष कर्तृत्त्व गाजविले अशा महिलांचा सत्कार करणे अपेक्षित आहे.

या प्रत्येक धर्माने स्त्रीला दिलेले दुय्यम स्थान पण प्रत्यक्ष जीवनात स्त्रीने सिद्ध केलेले स्वत:चं कर्तृत्व, पुरुषांच्या बरोबरीने व काही क्षेत्रात पुरुषांच्याही पुढे घेतलेली भरारी अशी मांडणी करता येईली. त्यासोबत दैव, प्रारब्ध, संचित या कल्पनांना कवटाळत स्वस्थ बसून न राहाता आपल्या नशीबाला दोष देत या महिलांनी जीवनात दाखविलेने ध्यैर्य, त्याचा हा गौरव आहे, अशीही मांडणी करता येईल.

**पूर्वतयारी :-** अशा योग्य महिलांची निवड, संपर्क, संवाद व कार्यक्रमास त्यांना उपस्थित ठेवणे.

**कार्यवाही :-** या कार्यक्रमाचे आयोजन आपल्या क्षमतेप्रमाणे करता येईल. श्रोते जमविणे कठीण वाटत असल्यास असे कार्यक्रम एखाद्या महिला महाविद्यालय, शाळेत अथवा अन्य महाविद्यालयात घेता येऊ शकतात. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कोणी महिला अधिकारी वा पदाधिकारी मिळाल्यास अधिक चांगले.

कार्यक्रमाची रुपरेखा पुढीलप्रमाणे ठेवता येऊ शकेल.

१) गाणे, २) प्रास्ताविक व मान्यवरांचा परिचय, ३) अध्यक्ष निवड, ४) मान्यवर अतिथींचा सत्कार, ५) भूमिका, ६) मान्यवरांच्या हस्ते उपस्थितीत कर्तृत्ववान महिलांचा सत्कार ( सत्कारापूर्वी प्रत्येक महिलेचा सविस्तर परिचय करुन द्यावा म्हणजे श्रोत्यांना त्यांची पुरेशी माहिती मिळेल, आलेल्या महिलांनाही बरे वाटेल), ७) कर्तृत्ववान महिलांची मनोगते, ८) मान्यवरांची मनोगते, शेवटी अध्यक्षीय मनोगत, ९) आभार, १०) गीत (अधून-मधून गिते घेतल्यासही चालेल, पण गाण्यांची निवड योग्य असावी)

**आवश्यक साधने :-** विशेष नाही.

**मार्गदर्शक संपर्क :-**

## (३) २६ ते ३० जानेवारी - संविधान बांधिलकी महोत्सव

**कालावधी -** २६ ते ३० जानेवारी.

**भूमिका :-** भारताचे संविधान हा सर्वोच्च ग्रंथ आहे, जो स्वातंत्र्य, समाजबंधुता, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता, समाजवाद यांच्या बाजूने समर्थपणे उभा आहे. अंनिसचे कार्य हे राज्यघटनेच्या चौकटीत चालते, आणि समाजाची व्यवस्था राज्यघटनेतील मुद्यांना अनुसरुन निर्माण करणे यासाठीच प्रत्येक डाव्या पुरोगामी चळवळीच्या कार्यकर्त्यांची धडपड असते. म्हणून एखादा उत्साह साजरा करावा या भूमिकेने संविधान बांधिलकी महोत्सवाचे आयोजन करावे.

**पूर्वतयारी :-** एकूण पाच दिवसांपैकी किती दिवस कोणकोणते कार्यक्रम घ्यायचे? त्याची पूर्व प्रसिद्धी? संविधान बांधिलकी महोत्सव, संयोजन समिती तयार करणे, विविध बॅनर्स, पोस्टर्स तयार करणे, ध्वजारोहणाची जागा, वेळ याची निवड. संविधान दिंडीसाठी शाळा, महाविद्यालयांशी संपर्क वगैरे.

**कार्यवाही :-** या महोत्सवानिमित्ताने अनेक उपक्रम घेता येतील- १) २६

जानेवारी ध्वजारोहण– दलित महिला, कामगार, शेतकरी, युवक यांच्या हस्ते. १) संविधान दिंडी, ३) महाविद्यालयात व्याख्यान– संविधानातील विविध मूल्यांना घेऊन, ४) चालता–बोलता संविधान.

**आवश्यक वाचने –**

**मार्गदर्शक संपर्क –** अविनाश पाटील, माधव बावगे, मिलींद देशमुख

# (४) १२ फेब्रुवारी – चार्लस डार्विन चा जन्म दिवस

**कालावधी :–** १२ फेब्रुवारी

**भूमिका : –** डार्विनच्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताने मानवाच्या उत्क्रांतीचा दर साधार उलगडला. आणि मानवी जीवनाच्या जन्माच्या सर्व दैवी कल्पनांना ठोस प्रतिउत्तर मिळाले. 'सरव्हायव्हल ऑफ दि फिटेस्ट' या निसर्गाच्या नियमाच्या आधारे मानवाने स्वत:च्या उत्क्रांतीसाठी स्वत:च निसर्गाच्या प्रतिकूलतेवर मात करुन यशस्वी लढाई केली आणि निसर्गावरर प्रक्रिया करत करत स्वत:ही उत्क्रांत झाले. अशी मांडणी होऊ शकते.

**पूर्वतयारी :–** १) डार्विनचा फोटो मिळवावा.

२) एखाद्या शाळेशी, विज्ञान महाविद्यालयाशी संपर्क, संवाद.

**कार्यवाही :–** डार्विनच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने अनेक उपक्रम घेता येतील.– १) शाळेत, महाविद्यालयात डार्विनचा उत्क्रांतीवाद यावर व्याख्यान देणे किंवा एखाद्या तज्ञ व्यक्तिंचे व्याख्यान संयोजित करणे.

२) वक्तृत्व स्पर्धा, विषय, दैववाद की प्रयत्नवाद.

३) विज्ञान प्रश्नमंजुषा

**साधने :–** १) डार्विनचा फोटो, त्याच्या सिद्धांताची माहिती देणारे पुस्तके (आपल्या वार्तापत्राचा दिवाळी अंकात बऱ्यापैकी माहिती उपलब्ध)

* **मार्गदर्शन संपर्क :–** प्रा. वा. रा. आर्डे, डॉ. आशुतोष मूळ्ये, टी. बी. खिल्लारे.

# (५) राष्ट्रीय विज्ञान दिन– विज्ञान प्रश्न मंजुषा

**कालावधी–** २८ फेब्रुवारी

**भूमिका –** अंनिस ही वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार करणारी चळवळ आहे. विज्ञानाच्या आधारे मानवाचे स्वत:चे जीवन अधिक सुखकर केले आहे. विज्ञान हे प्रयत्नवादाचे फलित आहे, दैवी नव्हे तर ऐहिक जीवनातील हे प्रयत्न आहेत, जेथे विज्ञान संपते तेथे अध्यात्म सुरु होते हे भ्रामक वाक्य आहे, कारण विज्ञान कधी संपत नसते, व वैज्ञानिक दृष्टिकोन हा जीवनाचे निर्णय घेतांना उपयोगात येणारा आजवरच्या अनुभवावरुन सर्वात योग्य मार्ग आहे.

## पूर्वतयारी :–

१) आपल्या परिसरातील सर्व शाळांना प्रश्नमंजुषेत सहभागी होण्यासाठी गट पाठविण्याचे आवाहन, नियोजन.

२) कोणत्याही एका शाळेत, महाविद्यालयात प्रश्नमंजुषाचा कार्यक्रम संयोजित करणे.

३) कार्यक्रमासाठी आपल्या परिसरातील एखादे वैज्ञानिक उपलब्ध झाल्यास अधिक चांगले.

४) प्रश्न काढून ठेवणे, राऊंड ठरविणे.

**कार्यवाही :–** प्रश्नमंजुषा कार्यक्रम संयोजित करणे सोपे असते, पण त्याच्या निवेदकावर जो रंगतदार कसा होईल याची जबाबदारी असते. आवश्यकतेप्रमाणे किंवा उपलब्धतेप्रमाणे गट करता येतील. गटांना वैज्ञानिकांची नाव देता येतील. काव्य प्रश्नमंजुषेचे कार्यक्रम होतात त्याप्रमाणेच याचीही कार्यवाही करावी.

१) प्रश्नाच्या उत्तरासाठी विशिष्ट वेळ देणे.

२) प्रश्नांची निर्विवाद उत्तरे आपणास माहित असणे.

३) विविध प्रकारचे राऊंड आखणे.

४) गुणांसाठी, वेळेसाठी स्वतंत्र जबाबदारी देणे (टाईम किपर)

५) नंतर त्यांना सहभागाचे प्रमाणपत्र देणे. प्रथम, द्वितीय, तृतीय, क्रमांकांना बक्षिसे देणे.

**आवश्यक साधने–** डॉ. सी.व्ही. रामन यांचा फोटो, प्रश्नमंच

**मार्गदर्शक संपर्क :–** विनायक सावळे, मो. ९४०३२५९२२६

*****

## (६) पर्यावरणीय होळी

**कालावधी : –** होळी (मार्च)

भूमिका :– रुढी, प्रथांच्या मानसिक गुलामीमुळे निसर्गावर जो हल्ला होतोय, त्याला थोपवायला हवं. पर्यावरणाच्या रक्षणासाठी अशा प्रथा, परंपरा, कर्मकांडे यांना पर्याय द्यायला हवेत. होळीच्या निमित्ताने होणारी वृक्षतोड, लाकूड, गोवऱ्या जाळणे, नैवद्याच्या रुपाने अन्न जाळणे ही नासाडी रोखण्यासाठी पर्यावरणीय होळीचा उपक्रम आहे.

**कार्यवाही :–** १) प्रबोधन रॅली

२) प्रसिद्धीपत्रक काढणे, वाटणे

३) पर्यावरण रक्षक म्हणून प्रतिज्ञा. वृक्षाच्या साक्षीने.

४) पर्यायी होळी, कॉपीची होळी, गुटख्याची होळी, दारुच्या प्रतिकात्मक पुतळ्याची होळी, माझ्यातील दुर्गूणांची होळी, कचऱ्याची होळी, असे पर्यायी होळीचे उपक्रम घेता येतील.

**पूर्व तयारी व आवश्यक साधने–**१) या उपक्रमाच्या कार्यवाहीसाठी शाळांनी सहभाग दिल्यास काम सोपे वरील सर्व (१ ते ४) उपक्रम त्यांच्या सहभागाने सहज घेता येतील. २) वनविभाग, सामाजिक वनीकरण विभाग यात सहभागी होऊ शकतो. ३) शाळेतील इलो क्लबत यात अधिकृतपणे सहभागी होऊ शकतात. ४)

पर्यावरण रक्षणाचे विविध घोषवाक्ये, बॅनर्स तयार करता येतील. ५) वनविभागाचे अधिकारी, पर्यावरण, यास प्रमुख अतिथी म्हणून बोलविता येतील.

******

## (७) १९ फेब्रुवारी– शिवाजी महाराज जयंती

**कालावधी–** शिवजयंती १९ फेब्रुवारी किंवा तिथीप्रमाणे (आपल्या सोईच्या दिवशी)

**भूमिका :–** शिवाजी महाराजांचा धर्मांध व प्रादेशिकवादी राजकीय पक्षांनी उपयोग केला आहे. या पक्षांनी शिवाजी महाराजांची प्रतिमा ही हिंदू धर्मियांचा राजा अशी केलेली आहे. मुळात ती तशी नाही. म्हणून शिवाजी महाराजांच्या जीवनाचे व्यापक अंग समाजासमोर येणे, धार्मिक सलोख्यासाठी शिवाजी महाराजांच्या क्रांतीचे निमित्त साधून कार्यक्रमांची आखणी करणे अशी अपेक्षा आहे.

**कार्यवाही –** १) व्याख्याने देणे

(शिवाजी महाराज– आम्हास न सांगितलेले

संदर्भ पुस्तिका– शिवाजी कोण होता–लेखक कॉ. गोविंद पावसरे)

२) शिवजयंती उत्सवाच्या छोट्या, मोठ्या समारंभात जाणीवपूर्वक मुस्लिम धर्मीय नागरीकांचा सहभाग घेणे.

**पूर्व तयारी :–** शिवाजी कोण होता? ही पुस्तिका /तिच्या काही प्रती उपलब्ध असाव्यात.

**मार्गदर्शक संपर्क :–**

******

## (८) ८ मार्च– जागतिक महिला दिन

**कालावधी** – ८ मार्च

**भूमिका :–** ३ जानेवारी– सावित्रीबाई फुलेंच्या जयंतीच्या भूमिकेप्रमाणे

कार्यवाही– १) महिला मंडळात कार्यक्रम, सहप्रयोग व्याख्याने

२) व्याख्यान– स्त्रीया आणि अंधश्रद्धा निर्मूलन

(भाषण–पुस्तक : श्रद्धा–अंधश्रद्धा– डॉ. नरेंद्र दाभोलकर)

३) एक मुलगी अथवा दोन मुलींवर संतती नियमनाचा निर्णय घेतलेल्या जोडप्यांचा सत्कार व परिसंवादाचे आयोजन.

**पूर्वतयारी :–** महिला मंडळे, बचत गट यांची नाव, पत्ते, दूरध्वनी क्रमांकासह माहिती असणे.

*****

## (९) २३ मार्च– शहीद दिन (शहादत दिन)

**कालावधी** – २३ मार्च

**भूमिका :–** ''शहीद भगतसिंग हा देशाच्या स्वातंत्र्यासाठी हिंसात्मक आंदोलन करणारा एक ध्येयवेडा तरुण होता'' ही त्यांची चूकीची प्रतिमा दूर करुन तो एक विचारी, विद्‌वान, ईहवादी (नास्तिक) दूरगामी परिणामांचाही वेध घेणारा धाडसी तरुण होता. ही प्रतिमा युवकांच्या समोर आणणे. तारुण्यसुलभ भावभावनांना थारा न देता देशाच्या स्वातंत्र्याचा एक 'जजबा' त्यांच्या होता. त्यांना युवकांचा खरा आदर्श म्हणून पुढे आणणे अपेक्षित आहे.

**कार्यवाही–** १) शहीद चित्रपट प्रोजेक्टर द्वारे तरुणांना दाखविणे व त्यावर चर्चा घडवून आणणे.

२) शहीदेआलम भगतसिंग – व्याख्यानाचे आयोजन

३) शहीद भगतसिंग – वक्तृत्व निबंध स्पर्धेचे आयोजन.

**पूर्वतयारी :–** फिल्म प्रोजेक्टर सह अनुषंगिक साधनांची उपलब्धता. तज्ञ व्याख्याने मिळविणे.

कॉ. दत्ता देसाई.

*****

# (१०) १४ एप्रिल– डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती.

६ डिसेंबर– डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती दिवस

**कालावधी–** १४ एप्रिल, ६ डिसेंबर

**भूमिका :–** जातीअंताच्या लढाईसाठीचा थोर तत्वचिंतक, मार्गदर्शक, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, अभ्यासू व्यक्तिमत्व. आज केवळ दलितांनीच बाबासाहेबांची जयंती साजरी करणे असे जे चित्र आहे ते बदलले पाहीजे. त्यासाठी वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांची अशा तऱ्हेने आखणी करायची की ज्यात एका व्यापक समाजघटकाचा सहभाग मिळेल.

**कार्यवाही :–** १) डॉ. बाबासाहेब आंबेडकर चित्रपट प्रोजेक्टरद्वारे दाखविणे व त्यावर चर्चा घडवून आणणे.

२) किमान ८ ते १० तास अभ्यास करणे. 'कृति अभिवादन कार्यक्रम' असे या उपक्रमास म्हणता येईल. १४ ते १६ तास अभ्यास करणे हे बाबासाहेबांचे वैशिष्ट्य होते. मन प्रत्यक्ष कृतीद्वारे, अभ्यास करुन त्यांना अभिवादन करणे. असा या उपक्रमातील हेतू आहे. नंतर सहभागी अभ्यासकांना बक्षिस, सत्कार करता येईल.

३) व्याख्यानाचे आयोजन.

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर– वक्तृत्व, निबंध स्पर्धेचे आयोजन.

**पूर्वतयारी –** चांगली प्रसिद्ध करुन अभ्यास करणोर तरुण मिळविणे, प्रोजेक्टर चित्रपटाची सीडी मिळविणे.

मार्गदर्शक :-

*****

## (११) महात्मा फुले जयंती

**कालावधी :** ११ एप्रिल, २८ *****

**भूमिका :** चातुर्वर्व्यवस्था, धर्माची गुलामगिरी, याला अखंड आयुष्यभर कृतिशील विरोध महात्मा फुल्यांनी केला. निरनिराळ्या कर्मकांडाची निरर्थकता व ह्यातून होणारे शोषण याबाबत आपल्या लेखणीद्वारे त्यांनी कठोरपणे आपली भूमिका मांडली. सत्यशोधकी पद्धती विवाह करण्याची वेगळी पद्धती निर्माण केली.

**कार्यवाही :-** १) व्याख्यान देणे

२) समता दिन म्हणून साजरा करणे.

******

## (१२) १ मे- महाराष्ट्र दिन, कामगार दिन

**कालावधी** - १ मे

**भूमिका व कार्यवाही :-** भाषावार प्रांतरचनेच्या सुत्रातून महाराष्ट्र ाज्याची निर्मिती. १ मे १९६० रोजी. पण भाषावाद व प्रांतवादाला थारा न देतो राष्ट्रीय एकतेची मानसिकता कार्यकर्त्यांची असणे. व्यावहारिक दृष्टीने सोईचे म्हणून भाषेला महत्त्व. पण याच दिवशी कामगार दिवस कामगारांच्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन करणे. या कार्यक्रमात अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसन, आरोग्य या विषयांबाबत मांडणी करणे, ध्वजारोहणाचा कार्यक्रम केल्यास कामगारांच्या हस्ते तो घडवून आणणे. यानिमित्ताने कामगार संघटनांशी संपर्क वाढविणे त्यांच्या कार्यकर्त्यांशी, नेत्यांशी परिचय संवाद वाढविणे.

**पूर्वतयारी :–** विविध कामगार संघ, संघटनांशी संपर्क करणे, गटागटाने कामगार उपलब्ध होतील असे ठिकाण निवडणे.

ध्वजारोहणाची व्यवस्था करणे (झेंडा, ध्वजस्तंभ उभारणे)

*****

## (१३) ५ जून– जागतिक पर्यावरण दिन

**कालावधी :–** ५जून अथवा शाळा उघडल्यावर सोईप्रमाणे.

**भूमिका :–** मानवी जीवन जगतांना प्रत्येक कृती ही पर्यावरणास ओरबाडणारी असू नये, याबाबत कार्यकर्त्याने दक्ष असावे. अगदी बाजारात जातांना घरुन स्वत:च कापडी पिशवी नेल्यास, बाजारात होणाऱ्या प्रत्येक खरेदीसाठी वापरल्या जाणाऱ्या पॉलीथिन बॅग्स नाकारता येतात. एक एवढासा नकारही फार मोठा प्रभाव पाडतो; पण याशिवाय जीवनातील अनेक प्रथा, परंपरा, कर्मकांडे ही पर्यावरणाला हानी पोहचविणारी आहेत. अशा परंपरांना पर्याय देणे, चूकीच्या प्रथा नष्ट करणे अशी यामागी भूमिका आहे. ज्याचा संबंध विधायक धर्मचिकित्सेशी आपणास जोडता येतो. उदा. पर्यावरणीय होळी, निर्माल्य दान करणे, वगैरे.

**कार्यवाही :–** यानिमित्ताने निषेध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा असे कार्यक्रम घेता येतील. असा वृत्तपत्रात लेख लिहीणे.

**पूर्वतयारी :–** या स्वरुपाच्या कार्यक्रमांच्या यशस्वीतेसाठी शाळा, महाविद्यालयांचे विद्यार्थी उपयोगी असतात. पण ५ जून पर्यंत शाळा उघडत नाही, अशावेळी वृत्तपत्रात लेख लिहीणे यासारखी कृती करता येईल व विविध स्पर्धा या शाळा उघडल्यावरही घेता येतील.

******

## (१४) वटपौर्णिमा

**कालावधी :–** वटपौर्णिमेचा दिवस

**भूमिका :–** हिंदू धर्मात विविध कर्मकांडे सांगितलेली आहेत. त्यातील सर्वच कर्मकांडे ही स्त्रीयांनीच करावयाची आहेत. कारण अर्थातच सर्व धर्मग्रंथांचे लेखन हे पुरुषांनी केलेले आहे. सर्वच धर्मांनी स्त्रीयांना दुय्यम स्थान दिले. वटपौर्णिमेच्या दिवशी सर्व महिला आपणाला ७ जन्मी हाच पती मिळाव म्हणून वडाला प्रदक्षिणा घालतात. या तिच्या कथनातील फोलपणा समाजासमोर मांडणे, स्त्रीला सन्मानाची वागणूक मिळण्यासाठी तिचे आत्मभान ('स्व' ची जाणीव) जागृत करणे.

**कार्यवाही :–** महिला मंडळे, महिला बचत गट, महिला महाविद्यालये, वाडी, वस्ती, गल्लीत कार्यक्रम घेणे त्यात कर्मकांडांची निरर्थकता, स्त्री–पुरुष समानता इत्यादी मुद्यांवर मांडण. सात जन्मी हाच पती मिळावा म्हणून सवासष्णी स्त्रीया हे व्रत करतात, अशा कार्यक्रमांपासून विधवा स्त्रीयांना दूर ठेवले जाते किंवा त्यांना अशा कर्मकांडात सहभागी होण्याचे अधिकार नाहीत, अशावेळी विधवा महिलेच्या हस्ते अशा कार्यक्रमांचे उद्घाटन करणे.

**पूर्वतयारी :–** महिला मंडळे, महिला बचत गट, महिला महाविद्यालये यांच्याशी पूर्वसंपर्क.

(यासोबत वटपौर्णिमेच्या दिवशी महिला सात जन्मी हाच पती मिळावा म्हणून उपवास करतात, वडाला फेऱ्या मारतात, याच्या विरोधात काही प्रतिकात्मक कार्यक्रम करता आल्यास जरुर करावा. जसे सात जन्मासाठी वडाला फेऱ्या मारणाऱ्या पत्नीलाच पतींनी सात फेऱ्या माराव्यात व या जन्मी एकनिष्ठ राहण्याचे अभिवचन आपल्या पत्नीस द्यावे. वडाला सात फेऱ्या हे कर्मकांड आहे, तर स्वत:च्या पत्नीला सात फेऱ्या मारणे ही एकनिष्ठ राहण्याच्या संकल्पाची अभिव्यक्ती आहे, अशी मांडणी करावी. याबाबत आपली मते, सूचना कळवाव्यात)

*******

## (१४) १३ जुलै– निळुभाऊ फुले स्मृती दिन/जयंती.

**कालावधी–** १३ जुलै अथवा त्या सप्ताहातील शाखा बैठकीत

**भूमिका–** ‘निळू फुले’ एक पुरोगामी सीनेनाट्य कलावंत. जनचळवळी संघटनांचे पाठीराखे, सहकारी व कृतिशील कार्यकर्ते. अंनिसच्या चळवळीत सतत मदतीची भूमिका. अशा व्यक्तिची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी बैठकीत स्मृती दिवस साजरा करणे.

**कार्यवाही :–** निळूभाऊ फुले यांचा अंनिस सोबत अनेक पुरोगामी संघटना, चळवळींशी संबंध होते. सर्व संघटनांचे प्रतिनिधी एकत्र येऊन छोट्या बैठकीतही त्यांना अभिवादन करता येईल. त्यांच्या विषयीच्या लेखांच्या आधारे मांडणी करता येईल.

**पूर्वतयारी :–** निळूभांऊविषयीची माहिती लेख, पुस्तके मिळविणे,समविचारींशी संघर्ष करणे, कार्यक्रमासाठी एखादा कलावंत प्रमुख अतिथी म्हणून लाभल्यास त्याचा फायदा कार्यालयास व संघटनेस होऊ शकतो.

******

## (१५) ६ ऑगस्ट– हिरोशिमा दिवस

**कालावधी –** दि. ६ ऑगस्ट किंवा आपल्या सोईप्रमाणे.

**भूमिका –** अण्वस्त्रे ही कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय नाहीत. साऱ्या पृथ्वीला कित्येकदा नष्ट करता येईल एवढी अण्वस्त्रे आज पृथ्वीवर विविध दिशांच्यात निर्माण केलेले आहेत. अण्वस्त्रांची निर्मिती व तिचा उपयोग या सर्व बाबी मानवजातीला नष्ट करणाऱ्या, पर्यावरणाला की धोखा पोहचविणाऱ्या आहेत. म्हणून यास विरोध करणे ही भूमिका आहे. कोणत्याही प्रकारच्या युद्धास विरोध.

**कार्यवाही :–** १) यावरील एक प्रसिद्ध डॉक्युमेंटरी उपलब्ध आहे. ती शाळा महाविद्यालये, जाहीर ठिकाणी दाखविणे, माहिती देणे, भूमिका स्पष्ट करणे.

२) प्रतिकात्मक अण्वस्त्र तयार करणे व विद्यार्थ्यांकडून ते नष्ट करणे.

अण्वस्त्रांना प्रतिकात्मक विरोध.

३) *** अण्वस्त्रे स्पर्धा =धोका. या विषयावर तज्ञांचे व्याख्यान आयोजित करणे.

४) निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा - विषय : विकास की विनाश ?

२) पुन्हा नको हिरोशिमा :-

**पूर्वतयारी :-** १) अण्वस्त्रे स्पर्धेबाबत पुस्तिका, टिपणे मिळविणे, आपल्याजवळ उपलब्ध असणे.

२) डॉक्युमेंटरी फिल्म मिळवणे.

**संपर्क :-** मिलींद देशमुख.

*******

# (१८) १ सप्टेंबर - जागतिक शांतता दिवस

**कालावधी -** १ सप्टेंबर

**भूमिका :-** 'जागतिक शांतता दिवस' या निमित्ताने आपल्या गावात, शहरात शांततेचं वातावरण निर्माण करणे, किंवा असलेली शांतता अबाधित ठेवण्यासाठी कृती करणे. कोणताही समुह, पक्ष, गट आपल्या मागण्या मान्य करुन घेण्यासाठी हिंसात्मक मार्गाचा अवलंब करतात. विविध जातीय धार्मिक दंगली घडतात किंवा पुतळा विटंबनेवरुनही संबंधित समाज हा हिंसक होणे अशावेळी जे काही नुकसान होते ते समाजाचेच होते. सार्वजनिक मालमत्तेचं होणारं नुकसान हे कररुपाने सर्वसामान्य जनतेलाच भरावे लागते. हिंसक परिस्थितीमुळे पाळावे लागणारे बंद, संचारबंदी, याचा फटका रुग्ण, महिला यांच्यावर होतो. पर्यायाने सर्वसामान्य जनतेलाच त्याची झळ पोहोचते. अशावेळी

१) सज्जन शक्ती गप्प असते.

२) समाजातील मुठभकर, अक्षरश: बोटावर मोजण्याजोगे हिंसक व्यक्ति (ॲन्टी सोशल इलिमेंट) हे सर्व घडवून आणतात, कारण त्यांना कोणी विरोध करीत नाही.

म्हणून आपल्या मागण्यांसाठी सनदशिर आंदोलनाचा पुरस्कार करणे, दुसऱ्याच्या मत स्वातंत्र्याचा आदर करणे ही भूमिका समाजाच्या शांततेसाठी महत्त्वाची ठरते. अशी भूमिका अपेक्षित आहे.

**कार्यवाही :–** १) महात्मा गांधीजींच्य प्रति**** सर्वधर्म प्रार्थना.

२) हिंसात्मक आंदोलकांना विरोध; **** घेणे.

******

# (१९) २१ सप्टेंबर – चमत्कार सत्यशोधन दिवस

**कालावधी –** २१ सप्टेंबर

**भूमिका :–** १) जगात कोणीही चमत्कार करु शकत नाही, चमत्कार करणारे बदमाश असतात. चमत्कारावर विश्वास ठेवणारे मुर्ख असतात व जे चमत्काराला विरोध करीत नाही ते भ्याड असतात. असे अब्राहम कोवुरांचे वाक्य आहे. २) चमत्काराला मान्यता म्हणजे संपूर्ण विज्ञानाला विरोध ही भूमिका असते. यातील विसंगीत समजावून द्यावी. पर्यायाने वै. ह. ला विरोध व परिणामत: भारतीय संविधानातील मूल्याला विरोध असा संबंध स्पष्ट करणे. ४) चमत्कारावर विश्वास ठेवण्याची मानसिकता अधिक घातक असते. कारण ती स्वत:वरचा म्हणजेच स्वत:च्या कर्तृत्वावरचा विश्वास गमावणे यातून माणसाचे माणुसपणच नष्ट होते अशी भूमिका. ५) याच दिवशी १९९५ साली आराध्य देवता गणपतीने दुध पिल्याचा चमत्कार जगभर झाला त्यामुळे हा दिवस पाळला जातो. ५) ‘विरोध देवाला नाही, देवाच्या नावाने केल्या जाणाऱ्या चमत्काराला’ हे वाक्य अधोरेखित करणे.

**कार्यवाही :–** १) जाहीर सहप्रयोग व्याख्यानांचे कार्यक्रम घेणे.

२) चमत्कार व विज्ञान सी.डी. दाखविणे

**पूर्वतयारी :–** शाळा, महाविद्यालयांशी संपर्क

******

## (२०) २ ऑक्टोबर – महात्मा गांधी जयंती

**कालावधी** – २ ऑक्टोबर

**भूमिका** – अंनिसची चळवळ म्हणून स्वत:ची एक विशिष्ट ******(इझम) नाही. अनेकविध विचारधारा मानणारे कार्यकर्ते चळवळीत अनेक वर्षापासून आहेत आणि त्याची कुठलीही अडचण कधी संघटनेला निर्माण झाली नाही अथवा कार्यकर्त्यांनाही कधी अडचणीचे वाटले नाही. महात्मा गांधींच्या जीवनातील निर्भयता व अंहिसा, त्याचप्रमाणे मर्यादित गरजेत कार्यकर्त्याने जगण्यापासून तर एका कार्य साध्यतेसाठी असावी लागणारी सातत्य, सचोटी असे अनेक भाग आपणास प्रेरणादायी आहेत. त्याचप्रमाणे धार्मिक सहिष्णुतेसाठीच्या कामासाठी गांधीजींसारखा दुसरा नेता नाही. या अनुषंगाने २ ऑक्टोबर रोजी काही वैशिष्ट्यपूर्ण कृती करता आल्यास अधिक चांगले.

**कार्यवाही :–**१) प्रत्यक्ष गांधींच्या ड्रेपरीत एखाद्या विद्यार्थ्यास तयार करुन गावातून फेरी (दांडीयात्रा) काढणे व गांधीजींच्या तोंडून सर्वांनी सहिष्णुतेची शपथ घेणे.

२) सर्वधर्म प्रार्थना सभेचे आयोजन करणे.

३) शाखेच्या बैठकीत विषयांची मांडणी. गांधीजींचा मला प्रेरणादायी वाटणारा गुण, अनुभव इत्यादि.

* **पूर्वतयारी :–** १) विविध शाळा महाविद्यालयांशी संपर्क.

२) विविध समविचारी संस्था– संघटनांशी संबंध.

******

# (२१) फटाके विरोधी अभियान

**कालावधी :–** दिवाळीच्या आधी किमान १ आठवडा

**भूमिका :–** प्रथा परंपरेच्या नावाखाली होणारे ध्वनी, वायु प्रदुषण रोखणे, पैशांचा होणारा चुराडा, अपघात, बालमजूरी याबाबत समाजात जागृती करणे.

**कार्यवाही :–** १) फटाके विरोधी अभियान प्रचार पत्रक काढणे (नमुना संपर्क)

२) फटाके विरोधी शालेय विद्यार्थ्यांची रॅली.

**विविध घोषणा :–**

३) फटाके विरोधी ****** कडून संकल्प पत्रके करुन घेणे.

४) विशिष्ट डेसिबल पेक्षा अधिक आवाजाच्या फटाक्यांच्या विक्रीस निर्बंध घालण्याबाबत तहसिलदार, जिल्हाधिकारी यांना निवेदन देणे.

५) फटाके विरोधी प्रचार फलक गावात लावणे

६) फटाके विरोधी जाहीर संकल्प स्विकारणे (शाळा–महाविद्यालये)

(अशा उपक्रमात रोटरी, लायन्स व जैन संघटना फार मदत करतात असा सर्वत्र अनुभव आहे, म्हणून संकल्प पत्रके, छपाई, बॅनर तयार करणे वगैरे कामांसाठी तुम्हाला प्रायोजक मिळू शकतील)

**पूर्वतयारी :–**१) पुरेशा आधी मदत करणाऱ्या संस्था संघटनांपर्यंत नेमक्या मदतीचं स्वरुप घेऊन पोहोचणे.

२) मुलांना शाळेला सुट्या लागण्याआधी,खरे तर परीक्षा होण्याआधीच शाळांशी संपर्क करणे, प्रत्यक्ष प्रार्थनेच्या वेळी १५ मिनिटे मिळतील अशी व्यवस्था करणे.

******

# (२२) २६ नोव्हेंबर संविधान स्विकृती दिन :-

**कालावधी :-** २६ नोव्हेंबर

**भूमिका –** भारताचे संविधान हा सर्वोच्च ग्रंथ आहे जो स्वातंत्र्य समानता, बंधुता, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता समाजवाद यांच्या बाजूने समर्थपणे उभा आहे. अंनिसचे कार्य हे राज्यघघटनेच्या चौकटीत चालते. आणि समाजाची व्यवस्था ही संविधानातील मूल्यांना अनुसरुन निर्माण करणे यासाठी प्रत्येक डाव्या-पुरोगामी चळवळीच्या कार्यकर्त्यांची धडपड असते. म्हणून संविधान स्विकृती दिन हा संविधानाची जी मूल्ये आपण स्विकारली त्यांना उजाळा देण्यासाठी, स्वतःच त्यांचे स्मरण करण्यासाठी साजरा करायचा आहे.

**कार्यवाही :-** (संविधान बांधिलकी महोत्सवाप्रमाणे)

१) संविधान दिंडी

२) ध्वजारोहण-दलित, आदिवासी महिला, कामगार, शेतकरी,युवा यांच्या हस्ते.

३) संविधानातील कोणत्याही एका मूल्याला धरुन व्याख्यानाचे आयोजन करणे.

४) चालता-बोलता संविधान.

५) सामुहिकपणे, जाहीरपणे प्रास्ताविकेचे वाचन करणे.

*** पूर्वतयारी :-** सर्व संबंधितांशी पूर्वसंकल्प, ध्वजारोहणाची तयारी.

*****

## (२४) ४ डिसेंबर –सती प्रथा बंदी दिन

**कालावधी :–** ४ डिसेंबर

**भूमिका :–** धर्माने अखंड मानवी जीवन कवेत घेतले आहे. अशावेळी मानवी जीवनात अनिष्ट रुढी आणि परंपरांच्या रुपाने धर्माने अनेक बंधने लादलीत; आश्‍चर्य म्हणजे शेकडो वर्ष समाज ही बंधने स्विकारुन जगत राहिला; तरीही वेळोवेळी अनेकांनी या धर्माच्या मजबूत शृंखलवेर घाव घातले. धर्माच्या नियमांना आव्हान दिले आणि त्यासाठीची किंमतही मोजली. हा इतिहास जरी कठोर असला तरी प्रेरणादायी आहे. त्यातीलच एक भाग सतीप्रथेला बंदी करणे हा आहे. बेंटींगने सतिप्रथा बंदी कायदा घडवून आणला. या निमित्ताने हा संघर्षाचा इतिहास प्रेरणादायी आहे म्हणून कार्यकर्त्यांना माहित असणे आवश्यक आहे, अशी ही भूमिका आहे.

**कार्यवाही :–**१) शाखेच्या बैठकीत या विषयाची कार्यकर्त्याने मांडणी करणे; गरज वाटल्यास एखाद्या अभ्यासू इतिहासाच्या प्राध्यापकास, शिक्षकास बोलवावे.

२) शक्य असल्यास हेच व्याख्यान जाहीर स्वरुपातही घेता येईल.

३) मी मोडलेली एक प्रथा/रुढी यावर निबंध स्पर्धा, मनोगते घेता येतील.

**पूर्वतयारी :–** १) सती प्रथेबाबतची सखोल माहिती मिळविणे.

२) व्याख्यानाची तयारी करणे.

******

## (२५) ३१ डिसेंबर– मद्यपान विरोधी संकल्प दिन

**कालावधी –** ३१ डिसेंबर

**भूमिका :–** ३१ डिसेंबर हा दिवस संपूर्ण जगभर मद्यपान करुन तथाकथित एन्जॉय करुन साजरा केला जातो. व्यसनाला विरोध ही आपली भूमिका आहे कारण व्यसन हे शरीर आणि विवेक दोन्हीही नष्ट करते. यासाठी हा दिवस मद्यपान विरोधी

संकल्प दिन म्हणून साजरा करावा.

**कार्यवाही :-**१) शाळा-महाविद्यालयांच्या सहकार्याने रात्री मद्यपान विरोधी रॅली काढणे (लातूर शाखा दरवर्षी अशी रॅली विशिष्ट पद्धतीने काढते, ज्यात मुली हातात पणत्या घेतात व मुले मशाली घेतात.)

२) दारुच्या बाटलीची प्रतिकात्मक होळी, प्रेतयात्रा काढणे.

३) दारुच्या व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन करणारी प्रचारपत्रके काढणे.

४) फलकलेखन, भिंती रंगविणे

५) स्थानिक वृत्तपत्रात लेखन करणे.

**पूर्वतयारी :-** १) व्यसनाचे दुष्परिणाम याबाबत सविस्तर माहिती मिळविणे.

२) किमान एक आठवडा आधी प्रचारपत्रके छपाई करणे, वाटणे.

३) शाळा, महाविद्यालयांशी पूर्वसंपर्क करणे.

**मार्गदर्शन :-** माधव बावगे.

*******

## (२६) अभिरुप न्यायालय किंवा डॉ. नरेंद्र दाभोलकर - आरोपीच्या पिंजऱ्यात किंवा आपकी अदालत किंवा जनता की अदालत

**कालावधी :-**शाखा व डॉ. दाभोलकर या दोहोंच्या सोईप्रमाणे कधीही.

**भूमिका :-** डॉ. दाभोलकरांचे विशिष्ट विषयांत भाषण आयोजित करणे फायद्याचेच ठरते. डॉक्टरांचे भाषण हे नेहमी प्रभावी ठरते व लोकांना ते पटते देखिल. पण एक विशिष्ट विषयासाठीच्या भाषणात अनेक विषय हे बाजूलाच राहतात. नंतर प्रश्नोत्तरे घेतली तर वेळी जातो. फक्त प्रश्नोत्तरे घेतली तरीही चालते, पण अभिरुप न्यायालयाच्या रुपात जर हा कार्यक्रम घेतला तर नाविण्यपूर्ण, वैशिष्ट्यपूर्णही ठरेल.

**कार्यवाही :–** एका न्यायालयाची मांडणी असलेले सभागृह, विचारमंच. त्यात एक न्यायाधिशाची भूमिका, एक जनतेच्या वतीने आरोप ठेवणारी व्यक्ती व एक प्रमुख जबाबदार व्यक्ती त्या आरोपांची विस्तृत मांडणी करण्यासाठी यात न्यायाधिशाच्या जागी कोणी ज्येष्ठ पत्रकार,वाचक, लेखक, कार्यकर्ता, समविचारी पक्ष, संघटनांचे नेते हे असू शकतील, आरोप ठेवण्यासाठी. कोणीही कार्यकर्ता चालेल पण आरोपांची चपखलपणे मांडणी करण्यासाठी कोणी अभ्यासू पत्रकार अथवा प्रमुख कार्यकर्त्यांनेच जबाबदारी घ्यावी. आरोप/प्रश्न जनतेकडून आधीच जाहिर आवाहन करुन गोळा करुन घ्यावेत. त्या प्रश्नांची सुसंगत मांडणी करुन घ्यावी. त्यासाठी दाभोलकरांशी आधी बोलून घ्यावे. म्हणजे मांडणी, अधिक प्रभावी होईल व कार्यक्रमाची रंगतही वाढेल.

या कार्यक्रमाची रुपरेषा –

१) आधी या कार्यक्रमागील भूमिका प्रमुख कार्यकर्त्याने मांडावी– १० मिनीटे

२) मान्यवरांचा परिचय व स्वागत.

न्यायाधीश, आरोप निश्चित करणारे, आरोपांची मांडणी करणारे व डॉ. दाभोलक–१० मिनिटे

३) प्रत्यक्ष अभिरुप न्यायालयाची सुरुवात. त्यात आरोप निश्चित करणे, त्यात आरोपांची थोडक्यात मांडणी करणे व नंतर डॉक्टर दाभोलकरांनी त्या आरोपांना उत्तर देणे असा हा कार्यक्रम. जास्तीत जास्त–१ तास.

४) न्यायाधिशाने शेवटी आपला निकाल जाहीर करणे– ३ ते ५ मिनिटे

५) आभार– असा साधारणपणे दीड तास हा कार्यक्रम होऊ शकतो.

**पूर्वतयारी –** १) या कार्यक्रमाचा अतिशय नियोजनबद्ध व चांगला प्रयोजन करणे (प्रचारपत्रके, पोस्टर्स, बातम्या, फळकलेखन)

२) जनतेकडून प्रश्न मिळविण्याचे नियोजन.

३) न्यायाधिश प्रश्न विचारणारे चांगल्या क्षमतेचे निवडणे.

४) श्रोतावर्ग चांगला दर्जेदार येईल यासाठी विशेष प्रयत्न करणे. विविध संस्था संघटनांचे कार्यकर्ते, डॉक्टर्स, वकील, अधिकारी, पदाधिकारी अशी विविध समाजघटकाची मंडळी उपस्थित राहतील हे पहाणे.

*****

## (२७) स्मशान सहल –

**कालावधी–** पावसाळ्याचे दिवस सोडून केव्हाही.

**भूमिका –** मृत्युनंतर काय? या प्रश्नाचे कुतूहल आदिम काळापासून मानवास राहीले आहे. मानवाने आपल्या आदिम अवस्थेत असतांना त्याच्या क्षमतेप्रमाणे भूत या कल्पनेला जन्म दिला. त्यामागील विविध शास्त्रीय कारणे काय आहेत, याची मांडणी करणे,त्यातून समाजात विशेषत: विद्यार्थ्यांना भूत या कल्पनेविषयीची भीती दूर करणे असा या कार्यक्रमामागील हेतू आहे.

**कार्यवाही :–** विविध शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची नोंदणी करुन स्मशान सहलीसाठी सहभाग मिळविणे. पोलीस ठाण्याची परवानगी काढणे. स्मशान सहलीसाठीची कार्यवाही खालीलप्रमाणे–

१) साधारणपणे संध्या ८:०० वाजेपर्यंत एका ठिकाणी सर्वांनी जमणे.

२) एकत्रितपणे स्मशानात जाणे.

३) सुरक्षित अनुकूल जागेची निवड करुन सतरंज्या, चटया अंथरुन सर्वांनी एकत्रित बसणे.

४) परिवर्तनाची गाणी म्हणणे.

५) त्यानंतर आलेल्या सर्वांनी स्वत:चे परिचय करुन देणे.

६) नंतर एका कार्यकर्त्याने भूत कल्पनेबाबत शास्त्रीय मांडणी करणे.

७) त्यानंतर प्रश्नोत्तरे घेणे.

८) काहींचे विशेष अनुभव असतील तर ते घेणे.

९) शेवटी सर्व सहभागींचे आभार मानने व एक गीत घेणे. रात्री १२.०० वाजेपर्यंत थांबणे, पण त्यापेक्षा अधिक वेळ थांबण्याची गरज नाही. त्यापेक्षाही आधी परत आलेत तरी चालेल.

**काही सूचना :-** १) स्मनशाभूमी ही जागा एका वेगळ्या अर्थाने समाजाचे श्रद्धास्थान असते. तेथील आपले वागणे हे परिपक्व असावे.

२) स्मशानात तळण तळणे, वाढदिवस साजरा करणे असे कार्यक्रम करु नयेत.

३) विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदवितांना आजारी असलेल्या विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेऊ नये.

४) काही पालकांनीही हजेरी लावल्यास अधिक चांगले.

५) अंनिसचे पदाधिकारी आपल्या कुटुंबियांसह आल्यास अधिक चांगले.

**पूर्वतयारी -**१) स्मशानभूमीची निवड, तेथील बसण्यायोग्य जागेची निवड.

२) रात्रीच्या वेळी तेथे प्रकाशाची काय व्यवस्था असेल याचे नियोजन करावे. ३) कोणी प्रमुख अतिथी बोलावावयाचा असल्यास त्याचे नियोजन करणे. ४) त्या ठिकाणी लाईट नाश्ता करणे. अपेक्षित असल्यास त्याचे नियोजन.

*****

## (२८) काळ्या बाहुलीचे दहन

**कालावधी -** आपल्या सोईप्रमाणे कधीही.

**कार्यवाही -** काळी बाहुली ही अंधश्रद्धेचे प्रतिक आहे. दर अमावस्येला संपूर्ण महाराष्ट्रभर काळी बाहुली व मिरची घरात, दुकानात, वाहनाला टांगण्यासाठी खरेदी केली जाते व जूनी फेकली जाते. अशा सर्व बाहुल्या एकत्रित करणे व एक प्रतिकात्मक मोठी बाहुली तयार करणे व मान्यवरांच्या हस्ते त्या सर्व बाहुल्यांचे दहन करणे म्हणजे अंधश्रद्धांचे दहन करणे. हा कार्यक्रम एखाद्या चौकात अथवा पटांगणात

घेता येईल.

**भूमिका :-** मानवाने आदिम अवस्थेत असतांना निसर्गातील विविध घटनांचे आपल्या ज्ञानाप्रमाणे, कुवतीप्रमाणे अर्थ लावले. अचानक जंगले बेचिराख करणारा वणवा, आकाशात चमकणारी वीज, वादळी पाऊस, सर्पदंशाने होणारे मृत्यू. या सर्व नैसर्गिक घटनांच्या मागे कोणीतरी दुष्ट, सुष्ट शक्ती आहे, तिला आपल्या अनुकूल करण्यासाठी, प्रसन्न करण्यासाठी त्याने ज्या क्रिया-कर्मकांडे करायला सुरुवात केली त्याला 'यातू क्रिया' असे म्हणतात. त्यात काहीतरी चांगले घडवून आणण्यासाठी जी कर्मकांडे होतात त्यास शुक्लयातू म्हटले गेले व जी कर्मकांडे दुसऱ्यांचे नुकसान करण्यासाठी निर्माण झाले त्याला कृष्ण यातू म्हटले गेले. काळी बाहुली दुसऱ्याचे दुष्ट प्रभाव नष्ट करणे यासाठीची योजना आहे. ही कर्मकांडे कशी निरर्थक व अशास्त्रीय यांची मांडणी करणे अपेक्षित.

**पूर्वतयारी :-** १) अनेक ठिकाणी फिरुन अशा बाहुल्या मिळविणे.

२) काळी बाहुली दहनासाठी अनुकूल जागेची निवड करणे.

३) एक मोठी प्रतिकात्मक काळी बाहुली तयार करुन घेणे.

**मार्गदर्शन संपर्क :-** प्रा. दिपक बाविस्कर, धुळे शाखा.

*****

# (२९) विज्ञान प्रश्न मंजूषा

**कालावधी -** २८ फेब्रुवारी -विज्ञान दिन, एखाद्या वैज्ञानिकाचा जन्मदिवस अथवा आपल्या सोईप्रमाणे कधीही.

**भूमिका -** विज्ञानाचे निसर्गनियमांचा शोध लावला आणि त्या नियमांचा उपयोग मानवाच्या प्रगतीसाठी झाला, विज्ञानामुळे जीवन सुकर झाले या विज्ञान विषयाबाबत विद्यार्थ्यांत गोडी निर्माण करणे. विज्ञानाच्या तत्त्वांची सार्वत्रिकता, व्यक्तिनिरपेक्षता, विज्ञानाच्या या तत्वांतून निर्माण होणारा मूल्य आशय, वैज्ञानिक

दृष्टिकोन विद्यार्थ्यांपर्यंत या निमित्ताने पोहोचविणे अशी भूमिका आहे.

**कार्यवाही –** विज्ञान प्रश्नमंजुषा (म्हणजेच क्वीज कॉन्टेस्ट) हा उपक्रम म्हणजे ज्ञान, मनोरंजन, स्पर्धा अशा सर्वांगाने उपयुक्त आहे. तालुकास्तरावरुन घ्यायचा असल्यास विविध शाळांचे गट बोलाविता येतील किंवा शाळा स्तरावर घ्यायचा असल्यास शाळेतीलच विद्यार्थ्यांचे गट करता येतील. त्यासाठीच्या सर्वसाधारण सूचना पुढीलप्रमाणे –

१) गट हा दोन किंवा तीन विद्यार्थ्यांचा असेल.

२) गटासाठी 'इयत्ता' हा घटक गृहीत धरावा.

३) ज्या इयत्तेचे गट आहे, प्रश्नसंचही त्याच्या अभ्यासाशी संबंधित (त्याच्या वयाच्या काठिण्य पातळीचा विचार करुन) असावेत.

५) प्रश्नांत विविधता असावी. १) एका शब्दात उत्तराचे, २) बहुपर्यायी, ३) चित्र ओळखा, ४) शास्त्रज्ञ ओळखा, ५) यंत्र ओळखा वगैरे.

६) प्रश्न विचारणारा निवेदक जाणकार, प्रसंगावधानी असावा,कारण त्यांच्या निवेदनाच्या शैलीवर कार्यक्रमाची यशस्वीता, रंजकता अवलंबून असते.

७) प्रश्नाच्या उत्तरासाठी किती वेळ द्यायचा, त्यासाठी टाईमकीपर ठेवावा.

८) गुणदान करण्याची पद्धती निश्चित करावी. गुणतालिका (एका फळ्यावर) तयार करावी.

९) मध्ये एखादा ब्रेक घेऊन विज्ञान गिते, संबंधित शास्त्रज्ञांची माहिती, वै. ह. वर एक २० मिनिटे थोडक्यात मांडणी असे कार्यक्रम घेता येतील.

१०) जिंकणाऱ्या गटास बक्षीसे देणे, पुस्तक रुपाने ही देता येतील. प्रायोजक मिळविल्यास किंवा थोड्या खर्चाची व्यवस्था केल्यास आकर्षक ट्रॉफीही तयार करता येतील (हल्ली बाजारात ८० ते १०० रुपयात चांगल्या दर्जाच्या ट्रॉफी तयार करुन मिळतात.)

११) सर्व सहभागींनी सहभागाचे प्रमाणपत्र द्यावे.

१२ ) हा उपक्रम दरवर्षी राबवावा. व या कॉन्टेस्ट ला शहरात प्रतिष्ठा मिळवून द्यावी.

१३) विविध गटांना वैज्ञानिकांची नावे देता येतील-

**पूर्वतयारी-** १) शाळा महाविद्यालयांशी संपर्क, गट तयार करणे, २) गटाच्या वर्गवारीप्रमाणे प्रश्नमंजुषेसाठी प्रश्न काढणे, ते गूपित ठेवणे, ३) या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून कोणी शास्त्रज्ञ, संशोधक मिळाल्यास अधिक चांगले, त्यासाठी प्रयत्न करावा. ४) प्रश्न आणि त्यांची उत्तरे याबाबत कोणतीही संदिग्धता असू नये.

या कार्यक्रमाची रुपरेखा साधारणपणे खालीलप्रमारे असू शकते.

१) विज्ञानगीत

२) कार्यक्रमाचे प्रास्ताविक

३) प्रमुख अतिथींचे स्वागत व परिचय

४) गटांना मंचावर बोलाविणे व क्रमाक्रमाने त्यांचा परिचय करुन देणे.

५) प्रश्नमंजुषेचे राऊंड, नियम, गुणदान पद्धती वेळ याबाबत त्यांना व सर्वांना माहिती देणे.

६) प्रत्यक्ष प्रश्नमंजुषा कार्यक्रमासह सुरवात.

७) अधुनमधून गुणांची माहिती देणे.

८) मध्यांतर घेणे मान्यवरांपैकी एक/दोन प्रमुखांची  थोडक्यात मनोगते घेणे.

९) उर्वरीत प्रश्नमंजुषा कार्यक्रम

१०) शेवटी गुणदान, स्पर्धेचा निकाल जाहीर

११) मान्यवरांच्या हस्ते बक्षिस

१२) सहभागीपैकी प्रातिनिधिक मनोगते

१३) अध्यक्षीय समारोप

१४) विज्ञानगीत

*****

## (३०) प्रश्न तुमचे उत्तर डॉ. नरेंद्र दाभोलकरांचे

**कालावधी –** डॉ. दाभोलकर व शाखा उभयतांच्या सोयीप्रमाणे कधीही

**भूमिका –** डॉ. दाभोलकराचे या क्षेत्रातील ज्ञान हे वादातीत असे आहे. त्यांची मांडण्याची शैली, त्यात उदाहरणासह दिले जाणारे स्पष्टीकरण, ओघवती भाषा या सगळ्या बाबींचा विचार करता महाराष्ट्रात त्यांना मिळणारा प्रतिसादही फार मोठा आहे. पण प्रत्येक वेळेस ते प्रत्येक शाखेत येऊन भाषण व प्रश्नोत्तरे घेतील हे वास्तवात शक्य होत नाही. म्हणून जर आधुनिक तंत्राचा उपयोग करुन (मोबाईल किंवा वेब कॅमेरा जे आजच्या काळात शक्य आहे) लाईव्ह त्यांना जनतेने प्रश्न विचारणे किंवा गोळा केलेले प्रश्न क्रमाक्रमाने त्यांना विचारणे आणि डॉक्टरांनी असतील त्या ठिकाणाहून मोबाईलने अथवा वेब कॅमेराच्या समोर बसून उत्तरे द्यावीत. असा हा कार्यक्रम आहे.

**कार्यवाही –** १) प्रथमत: डॉ. दाभोलकरांशी बोलून त्यांची तारीख व वेळ घ्यावी.

२) शक्यतोवर रात्रीची वेळ ही त्यांनाही व अशा कार्यक्रमाच्या दृष्टीनेही सोईची असल्याने रात्रीची घ्यावी.

३) भरपूर प्रचार करुन प्रश्न मिळवावेत व लोकांचा सहभाग मिळवावा.

४) प्रश्नांची उत्तरे 'लाईव्ह' हातील. ती मोबाईलने किंवा वेब कॅमेऱ्याच्या सहाय्याने होतील. याबाबत आवश्यक सोई सुविधा, शक्यता याचा विचार करुन ठरवावे.

५) मोबाईलने उत्तर मिळणार असल्यास तो 'हॅण्ड फ्री' करुन माईकशी जोडावा म्हणजे मोठा आवाज येईल.

६) हा कार्यक्रम डी. एड्., बी.एड्. कॉलेजेस्, एन.एस.एस. ची शिबीरे अशा

ठिकाणी घेणे अधिक चांगले व नियोजनाच्या दृष्टीने सोईचे ठरते.

७) जाहीर घ्यायचा असल्यास त्यासाठी अधिक प्रयत्न करावे लागतात.

**मार्गदर्शन :–** वेब कॅमेरा व तत्सम बाबी– कविता दळवी, स्मिता शिरसाठ, डॉ. नरेंद्र दाभोलकर.

******

# (३७) रस्ता जागर– गायन

**कालावधी–** समाजसुधारकांच्या जयंती–स्मृती दिनाच्या दिवशी अथवा शाखेच्या सोईने कधीही.

**भूमिका –** रस्ता जागर हा कार्यक्रम म्हणजे गावातील शहरातील विशिष्ट चौकांची (रहदारीच्या) निवड करुन त्या त्या ठिकाणी परिवर्तनाच्या गीतांचे गायन करणे, आजकाल अशी उपक्रम चळवळी करीत नाहीत, पण हा उपक्रम विनाखर्च थेट लोकांपर्यंत पोहोचण्याचा आहे. करके देखो– एकदा करुन पाहिल्यावर आपल्याला त्याचे यश समजू शकेल.

**कार्यवाही :–**रस्ता जागर उपक्रमात आधी निमित्त काय? हे ठरवावे. म्हणजे त्याच्याशी किमान संबंधित गाणी ठरविता येतील. गाणी गातांना सोबत सहभागाचे आवाहन करणारे, अथवा भूमिकेची मांडणी असलेले हॅण्डबीलही देता येईल, म्हणजे गाणी ऐकणाऱ्यांना कार्यक्रमामागील हेतू कळेल. एका चौकात १५ ते २० मिनिटे वेळ दिल्यास ३ ते ४ गाणी होतात. गाणी चांगल्या आवाजात सुरात म्हणावी, फार वाद्य असण्याची गरज नाही पण नाल किंवा ढोलक व एक खंजिरी असल्यास गीत सादरीकरण चांगले होते.

**पूर्वतयारी :–** १) कार्यक्रमाचे निमित्त निश्चित करणे व त्या अनुकूल गाण्यांची निवड करणे.

२) त्या गाण्यांचा आधी सराव करुन घेणे.

३) पोलीस ठाण्यात एक पत्रक माहितीसाठी देवून ठेवणे.

४) माईक वापरणार असल्यास रितसर परवानगी काढणे.

५) हॅण्डबील साठी मॅटर ठरविणे, छपाई करुन घेणे.

६) चौक ठरविणे, वेळ व थांबण्याची, उभे राहण्याची जागा आधी निश्चित करणे, रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही याची काळजी घेणे.

७) या गाण्यांच्या कार्यक्रमास नविन उत्साही युवक-युवतींना संधी देणे.

८) याला समाज जागर अभियान, विवेक जागर अभियान असेही म्हटल्यास हरकत नाही.

९) वेळ आपल्या सोईप्रमाणे ठरवाव्यात. पण अशीच दुपारी ठरवू नये. सकाळी काही चौक व संध्याकाळी काही चौक असेही नियोजन करता येईल.

**संपर्क :-** इस्लामपूर शाखा.

*****

## (३२) पथनाट्य /सडक नाट्य :-

**कालावधी -** आपल्या गरजेप्रमाणे, सोईप्रमाणे कधीही.

**भूमिका :-** पथनाट्य अथवा सडक नाटक हे माध्यम प्रचंड प्रभावी माध्यम आहे. ज्याने याचा प्रत्यक्ष अनुभव घेतलाय त्यांचा याचा अनुभव असतो. पण अनेक शाखा, आमच्याकडे संहिता नाही, या कारणाने या माध्यमांपासून दूर राहतात. मुळात या माध्यमासाठी संहितेपेक्षा कौशल्याची अधिक गरज आहे. हे अत्यंत प्रभावी असते. माध्यम अनेक कारणांनी उपयुक्त ठरते. याच्यापासून कितीतरी नवे तरुण-तरुणी आपल्याला भेटू शकतील. यासाठीची कौशल्य असणारा ग्रुप तयार झाल्यावर विविध घटनांना त्वरीत बोलकी प्रतिक्रिया देता येऊ शकते.एखादा विषय थेट समाजापर्यंत नेता येऊ शकतो. म्हणून सडक नाटक हा भाग आपल्या शाखेत तयार करणे, वाढविणे हे

संघटनेसाठी सद्यस्थितीत उपयुक्त आहे.

**कार्यवाही :–** शाखेत अथवा संपर्कातील इच्छूकांचा गट तयार करणे त्यांचे प्रशिक्षण घडवून आणणे. यासाठी इस्लामपूर शाखा आपल्याला मदत करु शकेल. सुरुवातीची काही विषयांवरील नाटके बसवून घेणे, त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्याचे काही प्रयोग स्थानिक ठिकाणी घडवून आणणे. जर शाखेतच याचे कौशल्ये असलेली कार्यकर्ते उपलब्ध असतील तर मग वाट कसली बघताय.

सडक नाटकाची नाद सुरु करा की.

**मागदर्शन–** इस्लमापूर शाखा.

**पूर्वतयारी–** आवड, इच्छुकांचा सहभाग मिळविणे.

*****

## (३३) आकाश दर्शन :–

**कालावधी :–** पावसाळ्याचे दिवस सोडून कधीही

**भूमिका :–** आकाशयस्य ग्रहगोळांविषयी मानवास असलेले कुतूहल फार पुरातन आहे. ग्रह गोल, त्यांची निर्मिती, त्यांची भ्रमणे या सर्व भौतिक घटना आहेत. आणि त्याचा जरुर अभ्यास करायला हवा. पण या ग्रह गोलांचा मानवी जीवनावर बरा वाईट परिणाम होतो हे मात्र अशास्त्रीय आहे, निराधार आहे. म्हणजे फलज्योतिष शास्त्राला काडीचाही आधार नाही. याबाबत ची तपशिलवार मांडणी करणे अशी ही भूमिका आहे.

**कार्यवाही :–**रात्रीच्या वेळी आणि खरे तर पहाटे च्या वेळी आकाशातील ग्रह गोलांची, नक्षत्रांची माहिती देणे हा एक आनंद देणारा, उत्सुकता निर्माण करणारा उपकृत आहे. आकाशदर्शन एकाचवेळी बॅटरीच्या सहाय्याने तज्ञ कार्यकर्ते/मार्गदर्शक आकाशातील स्थितीचे ग्रहगोलांचे, ताऱ्यांचे, नक्षत्रांचे वर्णन करीत असतात.

त्यांच्याशी संबंधीत घटनांची माहिती देत असतात. सोबत दुर्बिणीच्या सहाय्याने त्यांचे शक्य तेवढ्या जवळून दर्शनही घडत असते.  आकाश दर्शनासोबत प्रश्नोत्तरांचा कार्यक्रमही होतो. सोबत फिल्म प्रोजेक्टर जर लावला तर ग्रहगोलांशी /आकाशाशी संबंधित अनेक रोचक व तपशिलवार माहिती ठरणाऱ्या सीडीज् ही दाखविता येतात. यासाठी फार खर्च नाही. एखादे स्वच्छ मोकळे मैदान अथवा एखाद्या कार्यकर्त्याची मोठी गच्चीही याला पुरते. विद्यार्थी, पालक मोठ्या हौशेने अशा कार्यक्रमांना गर्दी करतात.

**पूर्वतयारी :-** १) आपल्या संघटनेचे या क्षेत्राचे जाणकार प्रा. नितीन शिंदे, हेमंत धानोरकर, संजय बनसोडे व ह्लह्लह्लह्लह्लह्लह्लह्लह्लह्लह्लह्लह्लह्लह्ल यांच्याशी बोलून त्यांच्या अनुकूल तारीख वेळ निश्चित करणे.

२) विद्यार्थ्यांत त्याचा चांगला प्रचार करणे, फार गर्दीची अपेक्षा करु नये, ४० ते ६० ही संख्या अशा कार्यक्रमांना पुरेशी ठरते.  म्हणजे माहिती नीट देता येते, प्रश्नोत्तरे चांगली होतात.

३) महाविद्यालयांचे भूगोल विषयाचे प्रमुख, अथवा एखादे प्राचार्य या कार्यक्रमास आपण प्रमुख अतिथी म्हणून बोलवू शकतो.

४) जेथे कार्यक्रम घेणार आहोत तेथे विद्युत पुरवठा अखंडीतपणे मिळेल, प्रोजेक्टरचा पडदा लावायला जागा मिळेल, वीज जोडणी करता येईल या बाबींची खात्री आधीच करुन घ्यावी.

**तज्ञ मार्गदर्शक :-** प्रा. नितीन शिंदे, प्रा. संजय बनसोडे, शेलार, हेमंत धानोरकर.

*******

# (३४) फळकलेखन :-

**कालावधी :-** वर्षभर नियमितपणे.

**भूमिका :-**समाजात आपल्या विषयाशी संबंधित घटना सतत घडत असतात किंवा अशा काही घटना घडतात ज्यावर अंनिस म्हणून आपण व्यक्त होणं आवश्यक असते. याला आपण चळवळ म्हणतो. अशा व्यक्त होण्याचे जे काही मार्ग आहेत त्यात सर्वात सोपा मार्ग म्हणजे फळकलेखन. पण नियमितता राखणे फार आवश्यक आहे. समाजात कृतिशिल हस्तक्षेप याचे एक छोटे उदाहरण आहे. ते सर्व शाखांना जमणं शक्य आहे.

**कार्यवाही :-** किमान एक लाकडी फळा बनवून घेणे किंवा पत्र्याचा वार्ताफलक तयार करुन घेणे. त्याची गावातील, शहरातील एक जागा नक्की करावी. त्या जागेत शक्यतोवर बदल करु नये. म्हणजे अंनिस चे वार्ताफलक कुठे असते? तर अमुक एक ठिकाणी असते, असे लोकांनी सांगायला हवे. त्या फलकावर सुवाच्य अक्षरात आपल्या सूचना, प्रतिक्रिया, आवाहने नियमितपणे लिहीत राहावीत. यातून आपली तत्कालीन विषयावरची भूमिका लोकांसमोर येते, ती बहुशा लोकांचीच भावना असते.

**पूर्वतयारी :-**

१) एक पत्र्याचा वार्ताफलक तयार करुन घेणे तसे सोपे व स्वस्त असते. लाकडी महाग व वजनाने अधिक असल्याने वापरण्यास कठीण असतो.

२) साधारणपणे ३ ह्न ५ किंवा ३ ह्न ६ फूटाचा वार्ताफलक असल्यास सविस्तरपणे लिहिता येईल.

३)अचानकपणे अंधश्रद्धेची संबंधित घडणाऱ्या घटना अथवा अन्य परिघावरील विषयांबाबतच्या घटना याबाबत आपली भूमिका काय? ती त्यात लिहावी. या भूमिकेबाबत आधी आपले अनुभवी कार्यकर्ते किंवा मध्यवर्ती यांच्याशी बोलून घ्यावे. म्हणजे आपल्या भूमिकेत कोणताही किंतु-परंतु राहणार नाही.

४) वर्षभरातून काही नियमित आवाहने असतील त्याचे लेखन आधीच तयार असावे. जसे होळी, दिवाळी वगैरे.

*******

## (३५) व्याख्यानमाला :-

**कालावधी :-** १) ११ एप्रिल - म. फुले जयंती

१४ एप्रिल- डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती,

२) वर्षभरात आपल्या सोईप्रमाणे कधीही.

**भूमिका :-**समाजात सतत विवेकाचा आज बुलंद ठेवण्यासाठी काहीतरी घडत राहणे, घडवत राहणे आवश्यक असते. सर्व बाजूला अनिती आणि शोषणाला मान्यता दिसत असतांना कुठेतरी नीतीचा स्वर ऐकू येणे ही बाब समाजातील माणूसपण जीवंत ठेवणारी असते. व्याख्यानमालेतून समाजातील असं माणुसपण जीवंत ठेवण्याचं एक काम घडू शकते. सत्संग आणि प्रवचनांच्या नावाने, गुरु सप्ताहाच्या नावाने, भागवत सप्ताहाच्या नावाने समाजात एका बाजूला दैववाद पसरविण्याचे काम सुरु आहे. अशावेळी व्याख्यानमालेच्या माध्यमातून समाजाला एक समर्थ पर्याय विवेकी सत्संगाचा निर्माण करणे, अशी ही भूमिका आहे.

**कार्यवाही :-**व्याख्यान मालेचा कालावधी हा आपल्या सोईप्रमाणे, सवडीप्रमाणे देखील करु शकतो, काही ठिकाणी सलग ३/५/७ दिवस अशी व्याख्याने चालतात, तर काही ठिकाणी सवडीप्रमाणे चालतात. पण यात सातत्य असणे फार आवश्यक असते. विषयांचा जीवंतपणा, वक्त्यांची योग्य निवड, कार्यक्रमाची नीट आखणी आणि योग्य व पुरेसा प्रचार या बाबी व्याख्यानमालेच्या यशस्वीतेसाठी आवश्यक असतात. व्याख्यानमालेसाठी किमान ३ तरी विषय व वक्ते असावेत; तर तिला व्याख्यानमाला म्हणता येईल. व्याख्यानमालेचं ठिकाण लोकांच्या दृष्टीने सोईचं असावं, व्याख्यानाची वेळ संध्याकाळची योग्य असते.

प्रत्येक कार्यक्रमाच्या शेवटी अंनिसचे आवाहन पत्रक वाचावे. शक्यतोवर ६:३० ते ८.३० ही वेळ सोईची वाटते. कारण यावेळेपर्यंत ऑफिसेस बंद होतात व ही वेळ जेवणापूर्वीची असते. व्याख्यान कोणाचेही असो ४५ मिनिटे ते एक तास या वेळेत असावे. याबाबत वक्त्याला विनंती करावी. व्याख्यानाच्या आधी गाणे, प्रास्ताविक, अध्यक्ष, स्वागत या बाबी नियोजनात घ्याव्यात. वक्त्याच्या भाषणानंतर आभार मानावे.

**पूर्वतयारी :-**१) व्याख्यानमाला वर्षभरात आपल्या सवडीने की विशिष्ट तारखांच्या दरम्यान याबाबतचा निर्णय आधी घ्यावा.

२) या व्याख्यानमालेचे सातत्य असणे फार महत्त्वाचे आहे. त्यासाठी वेळेची उपलब्धता याबाबतही चर्चा करावी.

३) विषय व वक्ते ठरविणे याबाबत अनुभवी कार्यकर्त्यांची मदत घ्यावी. मध्यवर्ती आपल्या शक्यतेप्रमाणे जरुर मदत करेल.

४) व्याख्यानमालेसाठी प्रायोजक मिळू शकतील. जर कोणी प्रायोजक मिळाले तर वक्त्यांचे मानधन, प्रवास खर्च व अन्य अनुषंगिक खर्च यास मदत होते.

५) या कार्यक्रमाचे अध्यक्ष, प्रमुख पाहुणे शक्य तेवढे असलेल्या विषयाशी संबंधित बोलवावेत.

****

## (३६) कुटूंब मेळावा :-

**कालावधी –** शाखेच्या सोईप्रमाणे कधीही.

**भूमिका :-** जोपर्यंत कार्यकर्ता व त्यांचे कुटूंबिय तसेच सर्व कार्यकर्ते व त्यांची कुटूंबीये यांच्यात परस्पर सुसंवादाचे आपुलकीचे नाते तयार होत नाही तोपर्यंत शाखेची बांधणी नीट झाली आहे असे म्हणता येत नाही. कुटूंबातील अन्य सदस्यांनाही हे माहिती असायला हवे की कोण आहेत असे कार्यकर्ते, ही काय स्वरुपाची कामे

करतात वगैरे. अशासाठी कुटूंब मेळाव्याचे आयोजन करणे अपेक्षित आहे.

**कार्यवाही :-** कुटूंब मेळावा हा एखाद्या पर्यटन स्थळी, शेतात, फार्म हाऊसवर अशा सोईच्या व विरंगुळा वाटेल अशा जागी ठरवावा. सर्व कार्यकर्त्यांनी आपल्या संपूर्ण कुटूंबासह येणे अनिवार्य करावे तर लहान मुलांसह घरी ज्येष्ठ आई-वडिलही असावेत. कुटूंब मेळावा हा कार्यकर्त्यांनी कुटूंबियांनी परस्पर चर्चा करणे, परिचय करुन घेणे, यासाठी असतो. म्हणून हा पूर्ण दिवसभराचा कार्यक्रम ठेवावा. सकाळपासून संध्याकाळपर्यंत जेवणाची स्वतंत्र व्यवस्था झाल्यास अधिक चांगले. पण ते नियोजन खर्चिक वाटत असल्यास कार्यकर्त्यांनी त्यांच्या कुटूंबियांनी आपापले डबे आणावेत. दिवसभर गप्पा-गोष्टी, गाणी, खेळ, जेवण, असा हा मोकळा ढाकळा कार्यक्रम असतो. यात थोडा वेळ घेऊन मांडणी करणाऱ्या कार्यकर्त्यांची नम्रपणे सर्व कुटूंबियांचे मन:पूर्वक आभार मानावेत. व तुमच्य सर्वांच्या सहकार्यामुळेच आम्ही ***** साठी वेळ देऊ शकतो याबाबतची विनम्रभावाने कृतज्ञता व्यक्त करावी.

कार्यकर्त्यांच्या कुटूंबियांनी कार्यकर्त्यांविषयी त्यांना काय वाटते, अंनिसच्या चळवळीबाबत काय वाटते अशीही चर्चा घडवून आणावी.

**पूर्वतयारी :-** १) वेळ, स्थळ सर्वांना सोईचे अनुकूल असे ठरवावे. २) या मेळाव्यात कोणा कार्यकर्त्यांच्या घरी ज्या काही आनंददायी घटना घडल्या असतील त्याची आधीच माहिती मिळवावी व मेळाव्यात त्यांचे जाहीर अभिनंदन करावे. उदा. कोणास विविध पुरस्कार मिळालेत का? कुण्या कार्यकर्त्यांचा मुलगा कुठे परीक्षेला चांगले यश मिळविले का? कुणी मोठ्या आजारपणापासून बरे झाले का? याची माहिती मिळवावी.

******

## (३७) रक्तदान, नेत्रदान, देहदान :-

**कालावधी :-** २३ मार्च- शहीद दिन, युवक दिन, आपल्या सोईप्रमाणे कधीही.

**भूमिका :-** रक्तदान, नेत्रदान व देहदान ही शुद्ध मानवतावादी भूमिका आहे, कार्यकर्त्यांनी नियमितपणे रक्तदान करणे आणि नेत्रदान व देहदान याबाबत स्वत:ची तसेच कुटूंबियांची, समाजाची मानसिकता तयार करण्यासाठी कृतिशील राहणे अशी ही भावना आहे. या क्षेत्रात कामास प्रचंड वाव आहे व तशी गरजही आहे. या कार्यक्रमास कोणाचा विरोध असण्याचे कारण नाही.

**कार्यवाही :-**स्वतंत्र अंनिसने रक्तदान शिबिराचे संयोजन करणे अपेक्षित नाही, कोणी शाखा करत असेल तर जरुर करावे, पण या स्वरुपाच्या काम करणाऱ्या संस्था, गट यांच्याशी प्रमुख भागीदार म्हणून जरुर जोडून घ्यावे. शाखेत रक्तदानाबाबत तसेच नेत्रदान व देहदान याबाबत पुरेशी माहिती असणे, आवश्यक फॉर्म असणे, नेत्रदान व देहदान याबाबतची प्रक्रिया माहित असणे आवश्यक आहे. २३ मार्च हा भगतसिंग, सुखदेव व राजगुरु यांचा स्मृती दिवस आहे. हा दिवस शहीद दिन म्हणून पाळला जातो. या दिवशी शाखांनी जर समाजाल रक्तदानाचे आवाहन केले तर चांगला प्रतिसाद मिळू शकतो. ज्यांनी देशासाठी आपल्या प्राणांचे बलिदान केले त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आपण १०० लि. रक्ताचे दान देशासाठी का करु शकत नाही? असे भावनिक आवाहन करावे किंवा युवक दिनाच्या निमित्ताने आवाहन करावे. रक्त जमविणाऱ्या बँका आवश्यक नियोजन करतात.

नेत्रदान व देहदान हा सातत्याने प्रचार करावयाचा भाग आहे. कार्यकर्त्यांनी जरुर यात सहभागी व्हावे, कुटूंबियांना समजावून द्यावे.

**पूर्वतयारी :-** १) **** बँकांशी संपर्क साधून त्यांच्या व आपल्या उभयतांच्या सोईची तारीख ठरविणे. २) नेत्रदान व देहदान याबाबतची प्रक्रिया संबंधित

यंत्रणेशी बोलून ठरविणे.

**मार्गदर्शक :–** डॉ. अर्जुन लालचंदाणी.

******

## (३८) विविध स्पर्धा :–

निबंध, वक्तृत्व, चमत्कार सादरीकरण, घोषवाक्य, कथाकथन, परिवर्तनाचे गीतन गायन इ.

**कालावधी :–** आपल्या सोईप्रमाणे, वर्षभर (परीक्षा कालावधी सोडून)

**भूमिका :–** विवेकवादी विचारांच्या प्रसारासाठी जी जी काही माध्यमे उपलब्ध आहेत त्या सर्व माध्यमांचा उपयोग करावा. त्यात शाळा महाविद्यालयांमध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करणे तसे सोईचे असते. विविध धार्मिक, अध्यात्मिक गट पंथ, परिवार विविध स्पर्धांच्या निमित्ताने या क्षेत्रात आधीच घुसले आहे, त्यात आपणाला समर्थ असा पर्याय देता यायला हवा, या अध्यात्मिक परिवारांच्या परीक्षांमध्ये विद्यार्थी रस घेतात कारण त्यांना त्या अध्यात्मिक विचारांची गोडी आहे असा होत नाही ते त्याच्या त्यावेळच्या कौशल्यांच्या विकासासाठी निमित्त ठरणारे असते म्हणून तो त्यात रस घेतो. म्हणून नियोजनबद्धपणे आपण शिक्षण क्षेत्रात जाऊन विद्यार्थ्यांना मानवाच्या विकासाला खऱ्या अर्थाने कारणीभूत ठरलेला वै. ह. व विवेकवाद याच्या प्रचारासाठी कृतिशिल झाले पाहीजे.

**कार्यवाही :–** विविध प्रकारच्या स्पर्धांपैकी नेमकी कोणती स्पर्धा आणि कोणत्या वयोगटासाठी घ्यायची हे निश्चित करावे. उदाहरणासाठी आपण वक्तृत्व स्पर्धेचे नियोजन करु या. आधी गट ठरवावे लागतील, विषय ठरवावा लागेल. समजा आपण विषय ठरवला, 'अंधश्रद्धा निर्मूलन काळाची गरज' मग इयत्ता ५ ते ८ व ९ ते १२ असे दोन गट करता येतील. एक महाविद्यालयीन गटही करता येईल. त्या सर्व संबंधीत शाळा महाविद्यालयांत त्याबाबतचे एक पत्रक पाठवावे लागेल. स्वत:च्या परिचयाचा,

संबंधाचा उपयोग करुन अधिकाधिक शाळांमधून प्रवेशिका येतील यासाठी प्रयत्न करावा लागेल. सर्व सहभागींना प्रमाणपत्रे देणे. प्रथम, द्वितीय व तृतीय गरज वाटल्यास उत्तेजनार्थ बक्षिस ठरविणे, प्रायोजन मिळविणे याचे नियोजन करावे लागेल व प्रत्यक्ष स्पर्धा कोणत्या ठिकाणी संपन्न होईल ती जागा निश्चित करावी लागेल. वक्तृत्व स्पर्धेसाठी सर्वसाधारणपणे ७ मिनिटांचा वेळ दिला जातो. परीक्षक चांगले ठरविणे, योग्य निवड होणे, अतिथी ठरविणे, बक्षिस वितरण करणे अशी कामे त्यात येतात. पण दरवर्षी जर अशी स्पर्धा घेतली तर आपल्या या स्पर्धेला एक प्रतिष्ठा मिळू शकते. बक्षिस जास्तीत जास्त रक्कमेचे ठेवण्यापेक्षा जास्तीत जास्त आकर्षक ठेवावे. ट्रॉफी, प्रमाणपत्र वगैरे.

**पूर्वतयारी :-**१) दरवर्षी घ्यायचे ठरविल्यास शाळा महाविद्यालयांना अनुकूल वेळ ठरवावी लागेल. जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर हे महिने सर्वसाधारणपणे चालतील किंवा डिसेंबर, जानेवारी.

२) शाळा महाविद्यालयांशी उत्तम संपर्क ठेवणे.

३) स्पर्धेसाठी विषयांची निवड, पुरेशा आधी शाळांना कळविणे (किमान १५ ते २० दिवस आधी) त्यांची प्रवेशिका स्विकारण्याचे ठिकाण ठरविणे. याचे नियोजन.

४) प्रवेशिका अधिक आल्यास त्याचेही नियोजन करावे लागेल.

हे उदाहरणादाखल एका स्पर्धेचे आयोजन झाले. अशा प्रकारे अन्य स्पर्धाही घेता येतील.

**स्पर्धा :-** निबंध लेखन, चित्रकला, चमत्कार सादरीकरण, घोषवाक्य, कथाकथन, गितगायन इत्यादि.

******

## (३९) सहप्रयोग व्याख्यानाचे कार्यक्रम :-

**कालावधी :-** केव्हाही, कधीही, कोठेही

**भूमिका :-** सहप्रयोग व्याख्यानाचे कार्यक्रम म्हणजे चमत्काराचे सादरीकरण करणे व त्याला जोडीने विषयाची मांडणी करणे, यात चमत्कारामागील विज्ञान, बुवाबाजी विरोधाची व्यापक वैचारिक भूमिका, आव्हान प्रक्रिया अशी मांडणी केली जाते. उपस्थित समुदाय व त्यांचा प्रतिसाद बघत अन्य विषयांची देखिल थोडीबहुत मांडणी करता येते.

**कार्यवाही :-** सहप्रयोग व्याख्यानाचे कार्यक्रम जर आपल्याकडे चमत्कार सादरीकरणाची किट अद्ययावत असेल, तर असे अनेक कार्यक्रम सातत्याने करता येतात, शाळा, महाविद्यालयात डी. एड्., बी. एड्. कॉलेज, एन.एस.एस. कॅम्प, गाव, वाडी, वस्ती अशा कोणत्याही ठिकाणी हे कार्यक्रम घेता येतात. त्यासाठी योग्य कौशल्याने चमत्कार सादरीकरण करता येणे आवश्यक आहे. शाखांनी याबाबतच्या प्रशिक्षणाची गरज असल्यास मध्यवर्तीशी संपर्क साधावा. 'संहिता चमत्कार सादरीकरणाची' हे प्रशांत पोतदार यांचे पुस्तक आणि समितीने तयार केलेल्या चमत्कार सादरीकरण सी.डी. या साधनांची मदत घेतल्यास स्वतंत्र वेगळ्या प्रशिक्षणाशिवाय चमत्कार सादरीकरण करता येऊ शकेल. या ठिकाणी चमत्काराच्या सादरीकरणाबाबतचा तपशिल सांगायची गरज नाही, पण ज्या शाखांमध्ये चमत्कार सादरीकरण करणारे कार्यकर्ते असतात त्या शाखा क्रियाशिल असतात.

**पूर्वतयारी :-** १) चमत्कार सादरीकरणाबाबत आवश्यक ती सर्व काळजी घ्यावी. जसे- रासायनिक पदार्थ 'टेस्ट' करुन घ्यावेत. ज्या चमत्कारांमध्ये एजंट वापरावा लागतो तो काही वेळेस नेमक्या त्याच चमत्काराप्रसंगी कुठे बाहेर निघून जातो आणि आपली फजिती होते. या काही बाबी आहे. 'संहिता चमत्कार सादरीकरणाची' या पुस्तिकेत या सर्व बाबींची सविस्तर मांडणी करण्यात आली आहे.

या कार्यक्रमाबाबत एक काळजी घ्यावी, आपल्या मांडणीत आपले वैचारिक मुद्दे येतील याची काळजी घ्यावी, अन्यथा लोकांच्या हशा व टाळ्यांच्या मोहात पडून आपण मनोरंजनाकडे गरजेपेक्षा जास्त झुकतो. तेव्हा तो कार्यक्रम प्रबोधनाचा न ठरता मनोरंजनाचा ठरतो असे होऊ नये.

शाखेत प्रमुख कार्यकर्त्याकडे स्वत:ची व एक शाखेची स्वतंत्र चमत्काराची कीट असावी.

******

## (४०) सत्यशोधकी विवाह :-

**कालावधी :-** वर्षभर कधीही

**भूमिका :-** अनिष्ट रुढी, प्रथा, परंपरा यांना विरोध करुन समर्थ विवेकी पर्याय देणे ही यामागील भूमिका आहे. मानवाच्या उत्क्रांतीच्या काळातील प्राथमिक अवस्थेतील धर्माचे जे स्वरुप होते, त्यातील कर्मकांडे ही यातू प्रधान होती. या यातू क्रिया या ना त्या कर्मकांउाच्या रुपाने आजही अस्तित्वात आहेत. मानवाच्या प्रगतीच्या वाटचालीने मानवाचे या निराधार कल्पनांनार तिलांजली द्यायला हवी होती पण तसे घडले नाही. ही कर्मकांडे मानवाने प्रगतीच्या वाटचालीत ही सोबतच आणली. त्याला अनेक सामाजिक, आर्थिक कारणेही आहेत. पण विवेकी समाजाच्या निर्माणात कर्मकांडे हा फार मोठा अडथळा आहे. म्हणून ती टाळणे व त्याला विधायक समर्थ पर्याय देणे ही सत्यशोधकी विवाहामागील भूमिका आहे. सत्यशोधकी विवाहाच्या कल्पनेतील महात्मा फुलेच.

**कार्यवाही :-** जे कोणी विवाहेच्छूक जोडपे, सत्यशोधकी विवाह करण्यास तयार असतील, त्यांचा विवाह शाखेने लावून देणे असा हा कार्यक्रम आहे. याबाबत लातूर शाखा व कोल्हापूर शाखा यांचे काम हे मार्गदर्शक आहे. याच्या कार्यवाहीसाठी यांच्याशीच संपर्क साधावा.

**माधव बावगे–** लातूर, कोल्हापूर.

**पूर्वतयारी :–**

******

## (४१) विज्ञान प्रदर्शनात वैशिष्ट्यपूर्ण सहभाग :–

**कार्यवाही :–** तालुका/जिल्हा/राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनाच्या वेळी.

**भूमिका :–** विज्ञानाचे मानवी जीवन सुसह्य व सुखकर केले आहे. विविध वैज्ञानिक शोध हे मानवाच्या विशाल बुद्धीमत्तेचे निदर्शक आहे. यातून जगातील कोणत्याही संकटाला, दु:खाला तोंड देण्यासाठी समर्थ मानवी बुद्धी हेच सर्वात प्रभावी हत्यार आहे. नशीब, दैव, प्रारब्ध, रुची या कल्पना त्याज्य ठरवत विज्ञानाला मूल्यांची जोड देत जीवन जगणे हाच खरा जगण्याचा मार्ग आहे. म्हणून विज्ञानाच्या संवर्धनासाठी घडणाऱ्या प्रमुख घटनांपैकी विज्ञान प्रदर्शन ही प्रमुख घटना आहे. अशावेळी अंनिस ची चळवळ म्हणून आपण त्यात लक्षवेधी सहभाग नोंदविणे आपल्यासाठी चळवळ म्हणून अनेक अंगांनी फायद्याचे आहे. म्हणून त्यात आपला सहभाग असावा.

**कार्यवाही :–** मग या सहभागाचे स्वरुप कसे कसे असू शकते? तर ते आपला वेळ, क्षमता कौशल्य यावर अवलंबून आहे. खाली अगदी छोट्या स्वरुपाच्या सहभागापासून तर प्रमुख सहभागापर्यंत सर्व पर्याय दिले आहेत. त्यातील आपणास अनुकूल, योग्य जो असेल तो ठरवावा व कृती करावी. तत्पूर्वी यातील जे प्रमुख आयोजक आहेत त्यांच्याशी पूर्वसंपर्क करणे, त्यांची संमती घेणेही कामे आहेत हे लक्षात घ्यावे.

१) स्वागताचे आकर्षक बॅनर लावणे. उदा.–

।। विज्ञानाची कास धरु, अंधश्रद्धा नष्ट करु ।।

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा–

सर्व विज्ञान प्रेमी विद्यार्थी-पालकांचे सहर्ष स्वागत करीत आहे.

२) अधांतरी साधू लावून- अंनिसच्या सहभागाचे आवाहन पत्रक वाटणे.

३) चमत्कारांचे केंद्र लावणे - ज्यात कार्यकर्ते विविध चमत्कार व त्यामागील विज्ञान लोकांना सांगून प्रबोधन करतील.

४) रात्रीच्या वेळी चमत्कार सादरीकरणाचा कार्यक्रम करणे (जिल्हा व राज्य विज्ञान प्रदर्शने निवासी व भरपूर श्रोते असलेली असतात तेव्हा रात्रीची वेळ जरुर मिळवावी)

५) बक्षिस वितरणात अंनिसची पुस्तकेही देणगी रुपाने शाखेने द्यावीत, आपले स्वतंत्र प्रमाणपत्र देता आल्यास अधिक चांगले. पुस्तकांचे स्टॉल लावणे स्वत:च्या कल्पकतेने आणखी विविध रुपाने आपला ठळक सहभाग नोंदविता येऊ शकतो.

**पूर्वतयारी :-** आपल्या सहभागासाठी संयोजनातील प्रमुख यंत्रणांचा पाठींबा आपणास मिळवावा लागेल. तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन हे पंचायत समितीच्या शिक्षण विभागामार्फत भरविले जाते व जिल्ह्याचे जिल्हा शिक्षणाधिकारी विभागाकडून त्यांचे संयोजन होते. या दोन्ही संयोजनात तालुका व जिल्हा मुख्याध्यापक संघ यांची प्रमुख भूमिका असते म्हणून मुख्याध्यापक संघांचे अध्यक्ष वा अन्य पदाधिकारी यांची माहिती आपणास असावी. राज्य विज्ञान प्रदर्शनाच्या संयोजनात जिल्हा मुख्य कार्यकारी अधिकारी ते जिल्हाधिकारी अशी सर्वच प्रमुख यंत्रणा त्यात सहभागी असते. म्हणून संबंधित यंत्रणांशी संपर्क साधून आपला सहभाग निश्चित करावा.

******

## (४२) शाखा पातळीवर घेता येतील अशी काही शिबीरे :–

**कालावधी :–** वर्षभर आपल्या सोईप्रमाणे कधीही.

**भूमिका :–** विविध प्रकारची प्रशिक्षण शिबीरे हा आपल्या कार्यकर्त्यांच्या जडणघडणीसोबत, समाजापर्यंत थेट आपला विचार पोहोचविण्यासाठीचे प्रमुख माध्यम आहे. त्याचा अधिकाधिक उपयोग आपण करायला हवा. या शिबीरांच्या संयोजनातून व मांडणीतून आपलाही अभ्यास होतो, संयोजन क्षमतांचा, कौशल्यांचा विकास होतो, सुटीचा कालावधी हा अशा शिबीरांसाठी उपयुक्त असतो.

**कार्यवाही :–** शिबीरे अनेक प्रकारची आहेत. त्यासाठी लागणारी साधने आपल्या कडे उपलब्ध आहेत. तर काही आपणच कल्पकतेने निर्माण करायची आहेत. या शिबीरांचे विषय व शिबीरार्थी खालील प्रकारे–

१) चमत्कार प्रशिक्षण शिबीर – कार्यकर्त्यांसाठी

२) बुवा कसा पकडावा– कार्यकर्त्यांसाठी

३) वक्ता प्रशिक्षण शिबीर– कार्यकर्त्यांसाठी

४) वैज्ञानिक जाणिवा प्रशिक्षण शिबीरे– शिक्षण (प्राथ./माध्य.) डी.एड्., बी.एड्. चे विद्यार्थी.

५) लैंगिकता प्रशिक्षण शिबीरे– महाविद्यालयीन तरुण/तरुणींसाठी.

याच्या स्वतंत्र सीडीज् संघटनेकडे उपलब्ध– मिलिंद देशमुख)

६) विज्ञान संस्कार/ विज्ञान छंद शिबीरे– ३ ते ५ दिवसांचे (शाळेच्या मुला–मुलींसाठी)

७) विवेकी व्यक्तिमत्व विकास शिबीरे– महाविद्यालयीन युवा.

अशी ही विविध प्रकारचे शिबीरे आहेत. यासाठी वक्त्यांची अथवा विषयांच्या मांडणीसाठी मुद्यांची गरज पडल्यास मध्यवर्तीशी संपर्क साधावा त्यांची व्यवस्था केली जाईल. पण शिबीर मोठ्या संख्येने होणे संघटनेच्या वाढीसाठी

आवश्यकच आहे. ती जरुर व्हावीत. या विविध शिबीर प्रकारात शिबीर क्रमांक ३, ६ व ७ वगळता सर्व प्रकाराच्या शिबीरांचे अभ्यासक्रम संघटनेत उपलब्ध आहेत. ३,६ व ७ क्रमांकाच्या शिबीराबाबत ही मार्गदर्शनक मध्यवर्तीकडून मिळू शकेल.

**पूर्वतयारी :–** शिबीरांसाठी शिबीरार्थी कोण आहेत? त्यांच्याशी संपर्क कसा साधायचा? नोंदणी कशी, कुठे, कोणी करायची? या काही पूर्वतयारीच्या महत्त्वाच्या बाबी आहे. या पूर्वतयारीवरच शिबीराची यशस्वीता अवलंबून आहे. काही शिबीरांसाठीचे मार्गदर्शन खालील कार्यकर्त्यांकडून मिळू शकेल.

१) चमत्कार प्रशिक्षण शिबीर – मच्छिंद्र मुंडे, राजू पोतदार, शहाजी भोसले.

२) बुवा कसा पकडावा– माधव बावगे.

३) वैज्ञानिक जाणिवा प्रशिक्षण– कुमार मंडपे, राजु पोतदार.

४) विज्ञान संस्कार शिबीरे – प्रा. परेश शहा, विनायक सावळे
कुमार संस्कार शिबीरे

५) वक्ता प्रशिक्षण शिबीरे – सुशिला मुंडे.

*****

## (४३) सहल कार्यकर्त्यांची :–

**कालावधी :–** आपल्या सोईप्रमाणे कधीही.

**भूमिका :–** कार्यकर्त्यांचे परस्पर संबंध जोपर्यंत मैत्रीचे, विश्वासाचे असत नाही तोपर्यंत मजबूत संघटन निर्माण होणे शक्य नाही. यासाठी कार्यकर्त्यांत चळवळीच्या कार्यक्रमाव्यतिरिक्त संवाद घडणे आवश्यक असते. त्यासाठी वर्षातून किमान एकदा शक्य त्या ठिकाणी सहलीला जाणे असा या मागील उद्देश आहे. पुणे शाखा /पिंप्री चिंचवड शाखा नियमितपणे ट्रेनिंगला जातात व त्याचा त्यांना भरपूर संघटनात्मक लाभ झालाय असा त्यांचा अनुभव आहे. म्हणून कामातील तसेच परस्परांतील ताणतणाव याला वाट करुन देण्यासाठी देखिल कशा उपक्रमांचा उपयोग

होतो. म्हणून शाखेच्या कार्यकर्त्यांनी सहलीला जावे. या सहलीत फक्त कार्यकर्त्यांनी जाणे अपेक्षित आहे. त्यांच्या कुटूंबियांनी नव्हे.

**कार्यवाही :-**सर्वांच्या सोईच्या दिवशी, सोईच्या ठिकाणी सहल काढावी. परस्परांशी बोलण्यास भरपूर वेळ मिळावा असे नियोजन असावे. फार जास्त दिवस व लांब अशी सहल न काढता १ अथवा २ दिवसाची, जवळपास अशी काढावी.

**पूर्व तयारी :-** सर्वसामान्यपणे सहलीची जी असते ती.

**मार्गदर्शक –** मिलिंद देशमुख, मिलींद सोनटक्के.

******

## (४४) जत्रा-यात्रात प्रबोधनाचे केंद्र सुरु करणे :-

**कालावधी –** आपल्या परिसरातील जत्रा-यात्रेचा दिवस.

**भूमिका :-** जत्रा-यात्रा या आपल्या परिसरात नियमितपणे होत असतात. अशा जत्रा यात्रात शेतकरी, शेतमजूर, मध्यमवर्ग फार मोठ्या प्रमाणात नियमितपणे जात असतो. अशा या जत्रा-यात्रांकडे जर आपण प्रबोधनाची एक संधी म्हणून बघितले तर त्याचा फार मोठा संघटनात्मक फायदा आपणास होऊ शकतो. याचे चांगले उदाहरण हे सातारा शाखेने मांढरादेवीच्या यात्रेत प्रबोधन केंद्र सुरु केलेले कार्य हे आहे. एरव्ही आपण जनसमुदायाकडे जातो, पण जत्रा-यात्रात तयार श्रोते मिळतात, अगदी वेगळा समाजघटक आपणास यानिमित्ताने उपलब्ध होतो. जत्रा-यात्रात महिलांचे प्रमाण लक्षणीय असते. त्यांच्याशी संवाद करण्याची संधी मिळते.

**कार्यवाही :-**यात्रे जागा मिळवून एक स्टॉल उभारावे. त्यात थोड्या-थोड्या वेळाच्या अंतराने विविध चमत्कारांचे सादरीकरण करणे व त्यामागील विज्ञान समजावून देणे असा हा कार्यक्रम होतो. रात्रीच्या वेळी शक्य असल्यास जाहीर कार्यक्रमही घेता येतो. कार्यक्रमात पुस्तके विक्रीसाठी ठेवणे, वार्तापत्र वर्गणीदार नोंदणीचे पावतीपुस्तक ठेवणे व सोबत अंनिसच्या कामात सहभागाचे आवाहन पत्रक ठेवणे आवश्यक आहे.

म्हणजे संघटनेसाठी या वेळेचा अधिकाधिक फायदा करुन घेता येऊ शकेल.

**पूर्वतयारी :–**यात्रेत जागा मिळवणे हे फार जिकरीचे काम असते, म्हणून त्यासाठी किमान महिनाभर आधी संपर्क करावा लागतो. विविध ठिकाणची परिस्थिती वेगळी असते. पण जागेसाठी किमान प्रयत्न करावे लागतात. तेथे स्टॉल लावणे म्हणजे एक छोटा मंडप टाकण्यासारखे असते. त्याचे नियोजन, त्याचप्रमाणे यात्रेत किती दिवस थांबायचे, तेथे कोण कोण कार्यकर्ते किती किती दिवस थांबतील त्यांची निवास व भोजन व्यवस्था, पुस्तक विक्रीसाठी आवश्यक पुस्तके, वार्तापत्राची पावतीपुस्तके, चमत्काराचे पुरेसे किट.

******

# (४६) संघटनेच्या सीडीज् दाखविणे :–

**कालावधी :** वर्षभर कधीही

**भूमिका :–** संघटनेचा विचार विविध माध्यमांच्या सहाय्याने पोहोचविण्याचा संघटना प्रयत्न करीत असते. त्यात सोपे माध्यम म्हणजे टी. व्ही. वर संघटनेच्या सी.डी. दाखविणे.

**कार्यवाही :–** आज संघटनेकडे अनेक प्रकारच्या सी.डी. उपलब्ध आहेत. त्यात **** का?, बुवाबाबांचा भांडाफोड, त्यात नरेंद्र महाराज, अनुराधाबाई देशमुख, असलमबाबा असे काही बाबा आहेत, सर्प विज्ञान, वयात येतांना मुलांसाठी, मुलींसाठी, घटनाचक्र, डॉ. दाभोलकरांच्या मुलाखती, बिहाईन्ड मॅजिक, चमत्कार सादरीकरण अशा सी.डी. एखाद्या कार्यकर्त्याच्या घरी वगैरे अथवा गल्लीत, कॉलनीत नीट प्रचार करुन लावल्यास त्याला चांगला प्रतिसाद मिळतो. असा अनुभव आहे. कार्यकर्त्यांना विशेष भाषणाची तयारी करण्याची गरज नाही, तर फक्त सी.डी. दाखवावी व अंनिस चळवळीची सहभागाचे, वार्तापत्र वर्गणीदार होण्याचे आवाहन करावे.

**पूर्वतयारी :–**सी.डी., सी.डी. प्लेयर, लावण्याची जागा, पुरेसा प्रचार या पूर्वतयारीच्या बाबी आहेत. सध्या महाराष्ट्रात अनेक ठिकाणी लोड शेडींग असते तेव्हा याचाही विचार करावा.

*****

## (४७) ग्रहणकाळातील उपक्रम :–

**कालावधी :–** ग्रहणांच्या दिवशी, अथवा ग्रहण दिनाच्या आदल्या आठवडाभर.

**भूमिका :–** ग्रहण ही एक भौगोलिक, महत्वपूर्ण घटना असते. त्या घटनेचा एक प्रेक्षक, अभ्यासक म्हणून सर्वांनी पुरेपूर आनंद घ्यायला हवा. या काळाला अशुभ मानणे म्हणजे मानवाच्या प्रगतीचा अपमान करण्यासारखे आहे. ग्रहण काळ हा अभ्यासाचा, निरीक्षणाचा काळ असतो, तो अशुभ नसतो. ही बाब शालेय विद्यार्थी, गृहीणी सर्वसामान्य लोकांपर्यंत विविध उपक्रमाच्या माध्यमातून पोहोचविणे, अशी यामागील भूमिका आहे.

**कार्यवाही :–** ग्रहणदिनाच्या आधीपासून या विषयाबाबत जनजागरण म्हणून काही उपक्रम घेता येतील.

१) प्रत्यक्ष ग्रहणाची माहिती व्याख्यान रुपाने शाळाशाळांमध्ये देणे.

२) विविध ग्रह–ताऱ्यांच्या सी.डी. फिल्म प्रोजेक्टरवर मुलांना दाखविणे.

३) ग्रह–ताऱ्यांची माहिती देणारे पोस्टर्स प्रदर्शन दाखविणे.

४) ग्रहणाबाबतची माहिती देणारी प्रचारपत्रके वाटणे.

प्रत्यक्ष ग्रहणाच्या दिवशी

१) विशिष्ट चष्मे ग्रहणाच्या निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देणे.

२) ग्रहणकाळात महिलांनी विशेषत: गरोदर महिला भाज्या चिरणे, फळे चिरणे.

३) ग्रहणकाळात वर्ज्य अशी सर्व कामे प्रतिकात्मक रुपाने सादर करणे.

अशी विविध उपक्रम आपल्या शाखेच्या क्षमतेप्रमाणे आपणास घेता येऊ शकतील.

**मार्गदर्शन**– प्रा. नितिन शिंदे, प्रा. संजय बनसोडे.

******

## (४८) गणेशोत्सव :–

**कालावधी** – गणेशोत्सवाच्या आधीचा पंधरवाडा

**भूमिका** – धर्माची विधायक व कृतिशिल चिकित्सा हे आपल्या कार्याचे सुत्र आहे. त्यातून आपण विसर्जित गणपती व निर्माल्य दान करा मोहीम अनेक वर्ष महाराष्ट्रभर राबवली. त्यातून आपण आता या मोहीमेतून बाहेर पडून हा उपक्रम शासकीय यंत्रणांच्या माध्यमातून पार पाडण्यासाठी आपण कृती करतो. नगरपालिका व महानगरपालिका यांच्याकडून याबाबतची कार्य घडवून आणावीत.

पण यापेक्षा वेगळ्या प्रकारे गणेशोत्सवात आपणास प्रबोधन व उपक्रम घेता येऊ शकतात. त्याची मांडणी पुढीलप्रमाणे–

**कार्यवाही :–**विविध प्रकारची कृती गणेशोत्सवाच्या किमान १५ दिवस आधी आपणास करता येऊ शकते.

१) प्रचारपत्रके काढून शाळूच्या मातीचे, लहान, नैसर्गिक रंग वापरलेल्या गणेशमुर्त्या घेण्याचे आवाहन करावे, 'एक गाव एक गणपती', 'एक वार्ड एक गणपती' यासाठीही आवाहन करावे, गणपती उठवतांना गुलाल उधळणे, दारु पिणे या स्वरुपाच्या चूकीच्या बाबींना थारा न देण्याचेही आवाहन करावे.

२) शक्य असल्यास शाळूच्या मातीच्या मूर्ती बनविण्याचे किंवा कागदी लगद्याची मूर्ती बनविण्याचे प्रात्यक्षिक शाळाशाळांमधून दाखवावे व मुलांना स्वत:च मूर्ती बनविण्यासाठी प्रेरीत करावे.

३) जिल्ह्यातील व शहरातील प्रमुख मूर्तिकारांना मूर्त्या कमी उंचीच्या बनविण्याचे विनम्र आवाहन करावे.

४) या स्वरुपाची उपक्रम गणेशोत्सवाच्या आधी होऊ शकतात. त्यात आणखी वेगळ्या उपक्रमाची माहिती देऊ इच्छितो.

५) आपल्या शहरात गणपती विसर्जनासाठी जी विहीर, तलाव, जलाशय, नदी याचा वापर केला जातो, त्या पाण्याचे गणेश विजर्सनापूर्वी नमुने घेऊन ठेवावे व विसर्जनानंतर त्याच पाण्याचे नमुने घ्यावेत. त्यातील रसायनांचा (घटकांचा) झालेला फरक, बदल नोंद करुन त्या प्रसिद्धी द्यावी.

२) गणेशोत्सवात आपण सहप्रयोग व्याखानांचे कार्यक्रम गणेश मंडळांच्या सहकार्याने घ्यावेत.

हाच उपक्रम मंगळागौरीसाठी देखिल करता येऊ शकतो.

**पूर्वतयारी :–** शाळांमध्ये प्रचार करायचा असल्यास त्यांच्याशी पूर्वसंपर्क साधावा.

*****

# (४९) सर्वेक्षण करणे व त्याचे निष्कर्ष प्रसिद्ध करणे :–

**कालावधी :–** वर्षभरात कधीही.

**भूमिका :–** समाजात अनेक रुढी, प्रथा, परंपरा, कर्मकांडे होत असतात. त्यामागील समाजाची नेमकी मानसिकता काय? याचा शास्त्रीय शोध घेणे यासाठी सर्वेक्षण हा उपक्रम आहे.

**कार्यवाही :–** नेमके कशाचे सर्वेक्षण करायचे आहे हे आधी निश्चित करावे जसे वटसावित्रीच्या व्रताचे सर्वेक्षण यात आधी –

१) प्रश्नावली तयार करावी.

२) ती प्रश्नावली आधिकाधिक महिलांकडून भरुन घ्यावी.

३) त्या सर्वांना त्यांच्या नावाची गुप्तता पाळण्याचे आश्वासन द्यावे.

४) ह्या सर्व भरलेल्या प्रश्नावलींचा संख्या शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करुन मग निष्कर्ष काढावे लागतील.

त्यातून आपणास कळू शकेल की,

किती टक्के महिलांनी सात जन्मी हाच पती मिळावा म्हणून हे व्रत केले?

किती टक्के महिलांनी कुटूबियांना बरे वाटावे म्हणून हे व्रत केले?

किती टक्के महिलांनी गल्लीतल्या महिलांनी केले म्हणून मला करावे लागले असे सांगितले किंवा

किती टक्के महिलांनी या कर्मकांडास नकार दिला.

अशी एक माहिती यातून मिळू शकते.

या माहितीला प्रसिद्धी द्यावी, यातून समाजमन कळते. याच पद्धतीने व्यसन, अन्य कर्मकांडे यांचेही सर्वेक्षण घेता येऊ शकते.

**पूर्वतयारी :-** प्रश्नावली तज्ञ व्यक्तिंकडून तयार करावी.

*******

## (५०) अधिकारी-पदाधिकाऱ्यांच्या सदिच्छा भेटी घेणे :-

**कालावधी :-** आपल्या सोईप्रमाणे/परिस्थितीनुरुप.

**भूमिका :-** अधिकारी व पदाधिकारी यांच्याशी आपली चळवळीचा कार्यकर्ता म्हणून ओळख असावी. म्हणून नवीन अधिकारी, पदाधिकारी आल्यास त्यांची सदिच्छा भेट मिळवावी. त्यांनाही स्थानिक कार्यकर्ते व चळवळ माहित असावी एवढाच यामागील हेतू आहे.

**कार्यवाही :-**नूतन अधिकारी, पदाधिकारी आल्यास (पी.आय., तहसिलदार, बी.डी.ओ., जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, न.पा. आयुक्त, एस.पी., आमदार, खासदार, सभापती वगैरे) त्यांची सदिच्छा भेट मिळवावी. गटाने

भेटीसाठी जावे. सर्व प्रमुख कार्यकर्त्यांचा परिचय करुन द्यावा. कामाविषयी माहिती द्यावी. लेखी स्वरुपात काही अहवाल देता आल्यास जरुर द्यावा, नाहीतर मध्यवर्तीने छापलेला अहवाल द्यावा. आपल्या शाखेची बातम्यांची कात्रणे, फोटो अल्बम दाखवावा. एखादे पुस्तक भेट म्हणून देता आले तर जरुर द्यावे. संपर्क मोबाईल नंबर घ्यावा व शेवटी त्याच्या शक्यतेप्रमाणे या कामात मार्गदर्शन करावे व सहभाग घ्यावा अशी विनंती करावी. या सदिच्छा भेटीत एक गुलाबपुष्प ही फार झाले. मोठा बुके वगैरे घेऊन जाण्याची गरज नाही.

**पूर्वतयारी :–** आधी फोन करुन वेळ मिळवावी, व ठरलेल्या वेळेत पोहचावे.

******

## (५१) कुंडलीची होळी :–

**कालावधी :–** आपल्या सोईप्रमाणे कधीही.

**भूमिका :–** आकाशस्थ ग्रहगोलांची स्थिती जी आपल्या जन्मवेळी असते, ती आपल्या जीवनातील घटनांना कारणीभूत ठरते आणि कुंडली मांडून ती समजून घेता येते, ग्रहगोलांचे मानवी जीवनावर होणारे परिणाम कुंडलीतील ग्रहगोलांवरुन समजतात व विशिष्ट कर्मकांडे (विधी) करुन ते परिणाम अनुकूल करुन घेता येतात. हे आहे फलज्योतिष शास्त्र. या शास्त्रानुसार मानवी जीवन संपूर्णत: पराधीन ठरते, मानवाने प्रतिकूल परिस्थितीत निसर्गाशी झगडत जे कर्तृत्व गाजविले त्याचे श्रेय ग्रहगोल व तथाकथित पूर्व जन्मातील कर्म यांना दिले जाते, जो मानवाच्या कर्तृत्वाचा अपमान आहे. म्हणून कुंडली हे दैववादाचे प्रतिक आहे. आणि मानवी जीवनाचे यश हे प्रयत्नवादावर आधारले आहे. म्हणून कुंडलीची होळी करुन दैववाद नाकारणे व प्रयत्नवाद स्विकारणे अशी यामागील भूमिका आहे.

**कार्यवाही :–**आधी नियोजनपूर्वक तुम्हाला एखाद्या महाविद्यालय, डी. एड्., बी.

एड्. कॉलेजला ‘फलज्योतिषाचा फोलपणा’ या विषयावर तुम्हास व्याख्यान लावावे लागेल. साधारणपणे ४५ मिनिटे या विषयावरची मांडणी करावी, त्यानंतर कोरी कागदे श्रोत्यांमध्ये वाटावीत. त्यावर प्रत्येकाने कुंडलीची चौकट काढावी व तीत आपले नाव, जन्मतारीख व अंदाजाने ग्रहगोलांची नांवे, क्रमांक घालावीत. (कुंडली जाळणे हा कार्यक्रम प्रतिकात्मक आहे. म्हणून प्रत्येकाची मूळ कुंडली असण्याची गरज नाही.) व टेबलावर, विचारमंचावर मेणबत्ती पेटवावी. तिला विवेकज्योत म्हणावे. या विवेकज्योतीवर प्रत्येकाने येऊन आपली कुंडली स्वत:च जाळावी. नंतर सर्वांनी एकत्रितपणे दैववाद नाकारुन प्रयत्नवादावर दृढ विश्वास दाखवत जगण्याच सामुहिक संकल्प सोडावा. हा संकल्प आपणास लिहिता येऊ शकेल. उदाहरणादाखल एक संकल्प देत आहोत.

“मी आज अस संकल्प सोडतो की,

मानवाची आज अखेरची प्रगती ही केवळ आणि केवळ त्याच्या स्वत:च्या प्रयत्नानेच झालेली आहे. मनुष्य हाच स्वत:च्य जीवनाचा शिल्पकार आहे, यावर माझा दृढ विश्वास आहे.

म्हणून मी आज निर्धारपूर्वक दैववादास नकार देत असून त्याचे प्रतिक असलेली कुंडली स्वत: जाळून प्रयत्नवादाचा पुरस्कार करीत आहे.”

**पूर्वतयारी :–**

१) विषयाची चांगली तयार करावी व मांडणी अभ्यासपूर्व असावी.

२) कुंडली मांडण्याची पद्धत शिकून घ्यावी.

३) मेणबत्त्या, फोटो, कागद, स्केच पेन सोबत असावीत.

४) कुंडली जाळणे हा कार्यक्रम श्रोत्यांपैकी जे कोणी इच्छूक असतील त्यांनीच करावा अशी सूचना द्यावी. ज्या श्रोत्याची स्वत:च इच्छा असेल त्याने कुंडली जाळावी, म्हणजे कोणाच्या भावना दुखावण्याचा प्रश्न येणार नाही.

मार्गदर्शक – प्रकाश घाटपांडे

*****